महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**(सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०)**

# महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७

(दिनांक ६ ऑगस्ट २०१४ पर्यंत सुधारित)

**(Maharashtra Act No. XX of 1978)**

# The Maharashtra Employment Guarantee Act, 1977

( *As modified upto the 6th August, 2014*)

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, महाराष्ट्र राज्य
मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

**२०१४**

**[ किंमत : रु. २५.०० ]**

## सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०

# महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७

(दिनांक ६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित)

---

## अनुक्रमणिका


**उद्देशिका**

**कलमे**

प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण दोन

**ग्रामीण क्षेत्रात रोजगाराची हमी**

३. कुटुंबांना ग्रामीण रोजगाराची हमी.

प्रकरण तीन

**रोजगार हमी योजना व बेरोजगार भत्ता**

३अ. ग्रामीण क्षेत्रांसाठी रोजगार हमी योजना.

३ब. हमी दिलेल्या रोजगार व सुविधा पुरविण्याबद्दलच्या शर्ती.

३क. वेतन दर.

३ड. बेरोजगार भत्त्याचे प्रदान.

३इ. विवक्षित परिस्थितीमध्ये बेरोजगार भत्ता संवितरित न करणे.

३फ. विवक्षित परिस्थितीमध्ये बेरोजगार भत्ता मिळण्यास हक्कदार नसणे.

प्रकरण चार

**अंमलबजावणी व संनियंत्रण अभिकरणे**

४. राज्य रोजगार हमी परिषद.

५. जिल्हा व पंचायत समितीच्या पातळीवरील समित्या व त्यांची कार्ये.

६. योजनांचे नियोजन व अंमलबजावणी यासाठी प्रमुख प्राधिकरणे.

६-१अ. जिल्हा कार्यक्रम समन्वयक व सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक.

६-१ब. कार्यक्रम अधिकारी, सह कार्यक्रम अधिकारी, अपर कार्यक्रम अधिकारी व विशेष कार्यक्रम अधिकारी.

६-१क. ग्रामपंचायतींच्या जबाबदाऱ्या.

६-१ड. ग्रामसभेने कामाचे सामाजिक अंकेक्षण करणे.

६-१इ. योजनेची अंमलबजावणी करतांना राज्य शासनाने पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या.

## **अनुक्रमणिका—**समाप्त

६-१फ. गाऱ्हाणी निवारण यंत्रणा.
६अ. (यास कलम १३अ असा क्रमांक देण्यात आला आहे.)
७. [वगळण्यात आले.]
७क. [वगळण्यात आले.]
८. [वगळण्यात आले.]
९. इतरत्र रोजगार असताना बेकारी भत्ता घेतल्याबद्दल शास्ती.
१०. [वगळण्यात आले.]
११. [वगळण्यात आले.]

प्रकरण पाच

**रोजगार हमी निधी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र, यांची स्थापना, पारदर्शकता व उत्तरदायित्व आणि लेखापरीक्षा.**

१२. रोजगार हमी निधीची स्थापना आणि योजनेसाठी त्याचा वापर करणे.
१२-अ. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र.
१२-ब. पारदर्शकता व उत्तरदायित्व.
१२-क. लेख्यांची लेखापरीक्षा.

प्रकरण सहा

**नागरी क्षेत्रांतील योजना**

१२-ड. नागरी क्षेत्रांमध्ये योजनेची अंमलबजावणी करणे.

प्रकरण सात

**खाजगी जमिनींवरील योजना**

१२-इ. विशिष्ट परिस्थितीत खाजगी जमिनींचे लाभार्थी अर्थसहाय्य मिळण्यास हक्कदार असणे.
१३. विवक्षित अधिनियमांतील सुधारणा व इतर कायद्यांमधील योजना व निधी यांच्या निर्देशांचा अन्वयार्थ लावण्यासाठी नियम.

प्रकरण आठ

**संकीर्ण**

१३-अ. प्रत्येक विभागातील योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्याचे व आढावा घेण्याचे आयुक्तांचे अधिकार.
१४. अधिकार सोपवणे.
१४अ. शास्ती.
१५. सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.
१६. अधिनियमाचा अधिभावी परिणाम असणे.
१६अ. अनुसूची दोन व अनुसूची तीन यांमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार.
१६ब. [वगळण्यात आले.]
१७. नियम करण्याचा अधिकार.
**अनुसूची - एक**
**अनुसूची - दोन**
**अनुसूची - तीन**

## Maharashtra Government Publication can be obtained from—

- THE DIRECTOR
  GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION
  MAHARASHTRA STATE
  Netaji Subhash Road,
  **MUMBAI 400 004.**
  Phone : 022 - 23632693, 23630695,
  23631148, 23634049

- THE MANAGER
  GOVERNMENT PHOTOZINCO PRESS AND BOOK DEPOT
  Photozinco Press Area, Near G.P.O.,
  **PUNE 411 001.**
  Phone : 020 - 26125808, 26124759

- THE MANAGER
  GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT
  Civil Lines,
  **NAGPUR 440 001.**
  Phone : 0712 - 2562615

- THE ASSTT. DIRECTOR
  GOVERNMENT STATIONERY, STORE AND BOOK DEPOT
  Shaha Ganj, Near Gandhi Chowk,
  **AURANGABAD 431 001.**
  Phone : 0240 - 2331468, 2331525

- THE MANAGER
  GOVERNMENT PRESS AND STATIONERY STORE
  Tarabai Park,
  **KOLHAPUR 416 003.**
  Phone : 0231-2650395, 2650402

**AND THE RECOGNISED BOOKSELLERS**

## सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०[१]

## (महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७)

[या अधिनियमास दिनांक १ ऑक्टोबर, १९७८ रोजी राष्ट्रपती यांची अनुमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ३ ऑक्टोबर, १९७८ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केला.]

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश यांद्वारे अनुकूलन, फेरबदल व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ (दिनांक २४ नोव्हेंबर, १९८०)*§

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१.

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ (दिनांक ३ मार्च, १९८३)†

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ (दिनांक २० सप्टेंबर, १९८४)*

सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ (दिनांक ३० डिसेंबर, १९९१)*

सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ (दिनांक १ मार्च, १९९२)*

सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ (दिनांक ७ ऑक्टोबर, १९८३)*†

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ (दिनांक ३१ ऑक्टोबर, २००६)*

सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ (दिनांक २२ फेब्रुवारी, २००८)*

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ (दिनांक २५ जुलै, २०१४)*

**महाराष्ट्र राज्यातील [२][ग्रामीण क्षेत्रांत, अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी ज्या कुटुंबातील प्रौढ सदस्य स्वतः होऊन तयार असतील अशा प्रत्येक कुटुंबाला रोजगाराची हमी देऊन] त्यांना काम मिळण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र**, १९७७, भाग पाच, असाधारण, पृ. १७९ (इंग्रजी) पहा.

* ही खूण अधिनियमाचा प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

§ सन १९८० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक पंधरा हा सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम ५ द्वारे निरसित करण्यात आला.

† सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याचे कलम ३ पुढीलप्रमाणे वाचावे :—

"३. मुख्य अधिनियमाच्या कलम ७ च्या पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी योजनेखाली राज्य शासनाच्या वतीने, घळी भरणे, पाझर तलाव आणि लहान पाटबंधारे तलाव यांच्या कामातील उत्प्लव-बांधाचा (वेस्ट-वेअरचा) भाग यासाठी, दिनांक ७ ऑक्टोबर १९९३ रोजी सुरू होणाऱ्या व हा अधिनियम **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकास समाप्त होणाऱ्या कालावधीमध्ये अनुसूची कंत्राट पद्धतीच्या आधारे करून देण्यात आलेले प्रत्येक कंत्राट हे, असे कंत्राट करून देण्यात आलेले होते तेव्हा, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या कलम ७ च्या तरतुदी जणू काही सर्व महत्त्वाच्या वेळी अंमलात होत्या अशा प्रकारे कायद्यानुसार वैध रीतीने करून देण्यात आलेले असल्याचे मानण्यात येईल आणि ते नेहमीच वैध रीतीने करून देण्यात आलेले होते असे मानण्यात येईल."

[२] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम २ द्वारे "ग्रामीण क्षेत्रांत, अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी स्वतः होऊन तयार असलेल्या सर्व प्रौढ व्यक्तींना रोजगाराची हमी देऊन" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील [1][ग्रामीण क्षेत्रांत, अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी ज्या कुटुंबातील प्रौढ सदस्य स्वतः होऊन तयार असतील अशा प्रत्येक कुटुंबाला रोजगाराची हमी देऊन] भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ४१ मध्ये निर्धारित केल्याप्रमाणे, त्यांना काम मिळण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** समाजाच्या आणि अर्थव्यवस्थेच्या लाभासाठी जी टिकाऊ मत्ता होऊ शकेल अशा कामांवर अशा प्रौढ व्यक्तींना कामावर लावणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** कुटीरोद्योग, ग्रामोद्योग आणि लघुउद्योग व कृषि-उद्योग यांमध्ये अधिक ग्रामीण मन्युष्यबळासाठी रोजगार देण्याचे चालू ठेवण्याकरिता तरतूद करणेही आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** विवक्षित पूरक, आनुषंगिक आणि परिणामरूप तरतूद करणे देखील आवश्यक आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या अठ्ठाविसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

[2][प्रकरण एक

**प्रारंभिक**]

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ असे म्हणावे.

[3][(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.]

(३) महाराष्ट्र राज्याच्या ज्या ग्रामीण क्षेत्रावर त्याची व्याप्ती आहे त्या सर्व क्षेत्रात तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जो दिनांक नेमील अशा [4]दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

[5][(अ) " प्रौढ " किंवा " प्रौढ व्यक्ती ", याचा अर्थ, अठरा वर्षे वयाची व्यक्ती, असा आहे ;

(अ-अ१) " अर्जदार " याचा अर्थ, ज्या कुटुंबाच्या प्रमुखाने योजनेखालील रोजागारासाठी अर्ज केला असेल असा कुटुंबप्रमुख किंवा त्या कुटुंबातील कोणतीही प्रौढ व्यक्ती, असा आहे;

(अ-अ२) " गट क्षेत्र " याचा अर्थ, ग्रामपंचायतींचा गट समाविष्ट असलेल्या एका जिल्ह्यातील सामूहिक विकास क्षेत्र, असा आहे;]

[6][(अ-१) " केंद्रीय अधिनियम " याचा अर्थ, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी २००५
अधिनियम, २००५, असा आहे ;] चा ४२.

---

[1] २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ३ द्वारे "ग्रामीण क्षेत्रांत, अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी स्वतः होऊन तयार असलेल्या सर्व प्रौढ व्यक्तींना रोजगाराची हमी देऊन" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ४ द्वारे हे शीर्षक दाखल करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे, पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[4] दिनांक २६ जानेवारी १९७९. पहा शा. नि. पी. डी. क्र. इजीएस-१०७७-८७-इएमपी-५, दिनांक २५ जानेवारी १९७९.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ६ (१) द्वारे, मूळ खंड "(अ)" ऐवजी, खंड "(अ)", "(अ-अ१)" व "(अ-अ२)" दाखल करण्यात आले.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ६(२) द्वारे, मूळ खंड "(अ-१)" ऐवजी, हा खंड दाखल करण्यात आला.

[1][(अ-२) " केंद्रीय परिषद " याचा अर्थ, केंद्रीय अधिनियमाच्या कलम १० च्या पोट-कलम (१) अन्वये घटित केलेली, केंद्रीय रोजगार हमी परिषद, असा आहे] ;

(ब) " समिती " याचा अर्थ, कलम ५ अन्वये घटित केलेली जिल्हा पातळीवरील समिती किंवा यथास्थिति, पंचायत समिती पातळीवरील समिती, असा आहे ;

[2][(ब-१) " जिल्हा कार्यक्रम समन्वयक " याचा अर्थ, जिल्ह्यातील योजनेच्या अंमलबजावणीसाठी, कलम ६-१अ च्या पोट-कलम (१) अन्वये पदनिर्देशित केलेला राज्य शासनाचा अधिकारी, असा आहे ;

१९५९ चा ३. (ब-२) " ग्रामपंचायत " याचा अर्थ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाखाली घटित केलेली पंचायत, असा आहे ;

(ब-३) " कुटुंब " याचा अर्थ, एकमेकांशी रक्ताचे, विवाहाचे किंवा दत्तकाचे नातेसंबंध असलेले आणि सामान्यपणे एकत्र राहणारे व एकत्रितपणे भोजन घेणारे किंवा सामाईक शिधापत्रिका धारण करणारे कुटुंबातील सदस्य, असा आहे ;]

[3][* * * * * * *]

[4][(ड) " अंमलबजावणी अभिकरण " यामध्ये राज्य शासनाचा कोणताही विभाग, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत किंवा इतर कोणतेही स्थानिक प्राधिकरण किंवा शासनाचा उपक्रम किंवा कार्यान्वयन यंत्रणा, यांचा समावेश होतो ;]

(ई) " अंमलबजावणी अधिकारी " याचा अर्थ, जिल्ह्यातील अंमलबजावणी अभिकरणाचा उच्चतम अधिकारी किंवा अभिकरणाचे कोणतेही अधिकार किंवा कर्तव्ये ज्याच्याकडे सोपविण्यात आली आहेत असा कोणताही दुय्यम अधिकारी, असा आहे ;

[5][(इ-अ१) " सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक " याचा अर्थ, जिल्ह्यातील योजनेच्या अंमलबजावणीसाठी कलम ६-१अ च्या पोट-कलम (४) अन्वये पदनिर्देशित केलेला राज्य शासनाचा अधिकारी, असा आहे ;

(इ-अ२) " सहकार्यक्रम अधिकारी " याचा अर्थ, योजनेच्या अंमलबजावणीसाठी कलम ६-१ब च्या पोट-कलम (१) खाली नियुक्त केलेला अधिकारी, असा आहे;]

१९४८ चा ११. [6][(इ१) " किमान वेतन " याचा अर्थ, किमान वेतन अधिनियम, १९४८ याच्या कलम ३ अन्वये राज्य शासनाने संबंधित परिमंडलातील शेतमजुरांसाठी निश्चित केलेले किमान वेतन, असा आहे].

---

[1] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ याच्या कलम २(अ) द्वारे खंड (अ-२) जादा दाखल करण्यात आला.

[2] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ६(३) द्वारे खंड (ब-१), (ब-२), (ब-३) दाखल करण्यात आले.

[3] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २ द्वारे खंड (क) वगळण्यात आला.

[4] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ६(४) द्वारे मूळ खंड (ड) ऐवजी हा खंड दाखल करण्याता आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ६(५) द्वारे खंड (इ-अ१) व (इ-अ२) समाविष्ट करण्यात आले.

[6] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ याच्या कलम २(ख) द्वारे खंड (इ१) हा जादा दाखल करण्यात आला.

[१] [(इ-२) " महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र " याचा अर्थ, कलम १२-अ खाली घटित केलेला महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र असा आहे ;]

[२] [ (फ) " पंचायत समिती क्षेत्र " याचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम ५ खाली घटित केलेल्या गटाचे स्थानिक क्षेत्र, असा आहे ;] १९६२ चा महा ५.

[३][ * * * * * * *]

[४][ (ग-१) " अग्रक्रमाने हाती घ्यावयाचे काम " याचा अर्थ, एखाद्या योजनेअंतर्गत प्राथम्य तत्त्वावर अंमलबजावणीसाठी हाती घेण्यात आलेले कोणतेही काम, असा आहे ;]

(ह) " उत्पादक कामे " याचा अर्थ, राज्य शासनाच्या मते, ज्या कामांमुळे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे उत्पादनाच्या वाढीस हातभार लागेल किंवा ज्या कामाच्या अभावी उत्पादनाच्या वाढीस प्रतिबंध होईल अशी कामे, असा आहे ;

(आय) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

[५][(आय-अ) " कार्यक्रम अधिकारी " याचा अर्थ, योजनेच्या अंमलबजावणीसाठी, कलम ६-१ब च्या पोट-कलम (१) खाली नियुक्त केलेला अधिकारी, असा आहे ;

(आय-ब) " प्रकल्प " याचा अर्थ, अर्जदारांना रोजगार पुरविण्याच्या प्रयोजनार्थ एखाद्या योजनेअंतर्गत हाती घेतलेले कोणतेही काम, असा आहे ;]

[६][(जे) " ग्रामीण क्षेत्र " याचा अर्थ, या कलमाच्या खंड (म-१) याच्या अर्थांतर्गत असलेले नागरी क्षेत्र, आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये स्थापित किंवा घटित केलेली कोणतीही नागरी स्थानिक संस्था किंवा कटक मंडळ यांनी व्यापलेले असेल अशा क्षेत्राखेरीज, राज्यातील कोणतेही क्षेत्र, असा आहे ;]

[७][(के) " योजना " याचा अर्थ, कलम ३-अ अन्वये तयार करण्यात व प्रसिद्ध करण्यात आलेली रोजगार हमी योजना, असा आहे ;]

[८] [(ल) " राज्य परिषद " याचा अर्थ, कलम ४ अन्वये घटित केलेली महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद, असा आहे ;

(म) " अंगमेहनतीचे अकुशल काम " याचा अर्थ, कोणतीही प्रौढ व्यक्ती कोणत्याही कौशल्याशिवाय किंवा विशेष प्रशिक्षणाशिवाय करण्यास सक्षम असेल असे कोणतेही अंगमेहनतीचे काम, असा आहे ;

---

[१] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ६(६) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६(७) द्वारे मूळ खंड (फ) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ६(८) द्वारे मूळ खंड (ग) वगळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ६(९) द्वारे मूळ खंड (ग-१ ) समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ६(१०) द्वारे मूळ खंड (आय-अ) व (आय-ब) हे समाविष्ट करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ६(११) द्वारे मूळ खंड (जे) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ६(१२) द्वारे मूळ खंड (के) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[८] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ याच्या कलम २(ग) द्वारे खंड (ल), (म) आणि (न) हे खंड जादा दाखल करण्यात आले.

१९६५ चा महा ४०. [1][(म-१) " नागरी क्षेत्र " याचा अर्थ, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याखाली घटित केलेल्या " क " वर्ग नगरपरिषदेचे किंवा नगर पंचायतीचे स्थानिक क्षेत्र, असा आहे ;]

[2][(न) " वेतन दर " याचा अर्थ, कलम ३-क मध्ये विनिर्दिष्ट केलेला वेतन दर, असा आहे ;

१९६२ चा महा ५. (ओ) " जिल्हा परिषद " याचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम ६ खाली स्थापन केलेली जिल्हा परिषद, असा आहे.]

[3][प्रकरण दोन

**ग्रामीण क्षेत्रात रोजगाराची हमी** ]

कुटुंबांना ग्रामीण रोजगाराची हमी.

[4][**३.** (१) ग्रामीण क्षेत्रात अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी स्वतःहून तयार असलेल्या प्रत्येक ग्रामीण कुटुंबातील प्रौढ सदस्यांना काम मिळण्याचा हक्क असेल. राज्य शासन, या अधिनियमान्वये तयार केलेल्या योजनेनुसार, केंद्रीय अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये हमी दिल्याप्रमाणे, ग्रामीण क्षेत्रात अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी ज्या कुटुंबातील प्रौढ सदस्य स्वतःहून तयार असतील अशा प्रत्येक कुटुंबाला काम देईल.

(२) राज्य शासन, केंद्रीय अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपेक्षा अधिक कालावधीसाठी योजनेअंतर्गत कुटुंबातील प्रत्येक प्रौढ सदस्याला काम मिळण्यासाठी तरतुदी करील.

(३) जिने योजनेअंतर्गत दिलेले काम केले असेल अशी प्रत्येक व्यक्ती कामाच्या प्रत्येक दिवसासाठी वेतन दराप्रमाणे वेतन मिळण्यास हक्कदार असेल.

(४) अधिनियमात तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त दैनिक वेतन साप्ताहिक तत्त्वावर किंवा कोणत्याही परिस्थितीत ज्या दिनांकास असे काम केले असेल त्या दिनांकानंतरच्या पंधरवड्यात संवितरित करण्यात येईल.]

[5][प्रकरण तीन

**रोजगार हमी योजना व बेरोजगार भत्ता**

ग्रामीण क्षेत्रांसाठी रोजगार हमी योजना.

**३-अ.** (१) कलम ३ च्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनांसाठी, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कलम ३ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे योजनेखाली समाविष्ट असलेल्या ग्रामीण क्षेत्रातील प्रत्येक कुटुंबाला आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये किंवा योजनेत निर्धारित केलेल्या शर्तींच्या अधीन राहून, ज्या कुटुंबातील प्रौढ सदस्य अर्जाद्वारे,

---

[1] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ६(१३) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ६(१४) द्वारे मूळ खंड (न) ऐवजी खंड (न) व (ओ) दाखल करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे हे शीर्षक दाखल करण्यात आले.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे मूळ कलम ३ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे हे शीर्षक व कलमे ३-अ ते ३-फ समाविष्ट करण्यात आली.

अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी स्वतः होऊन तयार असतील अशा प्रत्येक कुटुंबाला एका वित्तीय वर्षात हमी दिलेला रोजगार पुरविण्यासाठी योजना तयार करील.

(२) राज्य शासन, त्याने तयार केलेली योजना अंमलात असण्याचे चालू असेतोपर्यंत त्या योजनेचा सारांश कमीतकमी दोन स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करील, त्यापैकी एक वृत्तपत्र हे ज्या क्षेत्राला किंवा क्षेत्रांना अशी योजना लागू असेल अशा क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये खप असलेले स्थानिक लोकभाषेतील वृत्तपत्र असेल.

(३) पोट-कलम (१) अन्वये तयार केलेल्या योजनेत अनुसूची दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किमान वैशिष्ट्यांची तरतूद असेल.

(४) या अधिनियमान्वये तयार केलेली प्रत्येक योजना तयार केल्यानंतर लवकरात लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

हमी दिलेल्या रोजगार व सुविधा पुरविण्याबद्दलच्या शर्ती.

**३-ब.** (१) राज्य शासन, अनुसूची तीन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींना बाध न येता या अधिनियमान्वये हमी दिलेला रोजगार पुरविण्यासाठी योजनेच्या शर्ती विनिर्दिष्ट करील.

(२) या अधिनियमान्वये तयार केलेल्या कोणत्याही योजनेखाली कामावर नेमलेल्या व्यक्ती, अनुसूची तीनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किमान सुविधांपेक्षा कमी नसतील अशा सुविधा मिळण्यास हक्कदार असतील.

वेतन दर.

**३-क.** (१) केंद्रीय अधिनियमाच्या कलम ६ अन्वये केंद्र शासनाने विनिर्दिष्ट केलेला वेतन दर हा, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी वेतन दर असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये वेतन दर निश्चित करण्यात येईल अशा वेळेपर्यंत, किमान वेतन अधिनियम, १९४८ हा महाराष्ट्र राज्याला लागू असताना त्याच्या कलम ३ अन्वये राज्य शासनाने शेतमजुरांसाठी निश्चित केलेले किमान वेतन हे त्या क्षेत्राला लागू असणारा वेतन दर म्हणून विचारात घेण्यात येईल. १९४८ चा ११.

बेरोजगार भत्त्याचे प्रदान.

**३-ड .** (१) जर रोजगाराची मागणी करणाऱ्या एखाद्या अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यापासून किंवा आगाऊ केलेल्या अर्जाच्या बाबतीत ज्या दिनांकास रोजगाराची मागणी केली असेल त्या दिनांकापासून यापैकी जो नंतरचा असेल तेव्हापासून पंधरा दिवसांच्या आत त्याला रोजगार पुरविण्यात आला नसेल तर, तो, या कलमानुसार दैनिक बेरोजगार भत्ता मिळण्यास हक्कदार असेल.

(२) विहित करण्यात येतील अशा पात्रतेविषयक अटी व शर्तींना अधीन राहून, आणि या अधिनियमाच्या तरतुदी आणि योजना व राज्य शासनाची आर्थिक क्षमता यांना अधीन राहून, राज्य शासन राज्य परिषदेशी विचारविनिमय करून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा दराने, कुटुंबाच्या कायदेशीर हक्कांच्या अधीन, एखाद्या कुटुंबातील अर्जदारांना पोट-कलम (१) अन्वये देय असलेला बेरोजगार भत्ता देण्यात येईल :

परंतु, असा दर, वित्तीय वर्षात पहिल्या तीस दिवसांकरिता वेतन दराच्या एक चतुर्थांशपेक्षा कमी असणार नाही आणि वित्तीय वर्षाच्या उर्वरित कालावधीकरिता तो वेतन दराच्या एक द्वितीयांशापेक्षा कमी असणार नाही.

(३) कोणत्याही वित्तीय वर्षाच्या कालावधीमध्ये एखाद्या कुटुंबाला देण्यात येणाऱ्या बेरोजगार भत्त्याबाबत राज्य शासनाचे दायित्व,—

(अ) अर्जदारास एकतर त्याला स्वतःला कामावर हजर होण्यास किंवा त्याच्या कुटुंबाच्या कमीतकमी एका प्रौढ सदस्याला प्रतिनियुक्त करण्यासाठी ग्रामपंचायतीकडून किंवा कार्यक्रम अधिकाऱ्यांकडून निदेश देण्यात आल्यावर लगेच संपुष्टात येईल ; किंवा

(ब) ज्या कालावधीसाठी रोजगाराची मागणी केली असेल तो कालावधी संपल्यावर आणि अर्जदाराच्या कुटुंबाचा कोणताही सदस्य कामावर उपस्थित न राहिल्यावर लगेच संपुष्टात येईल.

(४) अर्जदाराच्या कुटुंबाला एकत्रितपणे देय असणारा बेरोजगार भत्ता, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या बाबतीत प्राधिकृत करील अशा कार्यक्रम अधिकाऱ्यांकडून किंवा अशा स्थानिक प्राधिकाऱ्याकडून (जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा ग्रामपंचायत यांचा समावेश असलेल्या) मंजूर करण्यात येईल व तो संवितरित करण्यात येईल.

(५) पोट-कलम (१) अन्वये बेरोजगार भत्त्याची प्रत्येक रक्कम ही, ती रक्कम ज्या दिनांकाला देय झाली असेल त्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत देण्यात येईल किंवा देऊ करण्यात येईल.

(६) बेरोजगार भत्त्याची रक्कम देण्याची कार्यपद्धती ही विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

विवक्षित परिस्थितीमध्ये बेरोजगार भत्ता संवितरित न करणे.

**३-इ .** (१) जर कार्यक्रम अधिकारी हा त्याच्या नियंत्रणाखाली नसलेल्या कोणत्याही कारणामुळे बेरोजगार भत्ता वेळेवर किंवा मुळीच संवितरित करण्याच्या स्थितीत नसेल तर, तो, ती बाब जिल्हा कार्यक्रम समन्वयकाला कळवील आणि त्याच्या सूचना फलकावर व ग्रामपंचायतीच्या सूचना फलकावर आणि त्याला आवश्यक वाटेल अशा इतर ठळक जागी नोटीस प्रदर्शित करून त्यामध्ये अशी कारणे जाहीर करील.

(२) बेरोजगार भत्ता प्रदान न करण्याची किंवा तो विलंबाने प्रदान केल्याची प्रत्येक बाब, जिल्हा कार्यक्रम समन्वयकाकडून सादर करण्यात येणाऱ्या वार्षिक अहवालातून असे प्रदान न करण्याच्या किंवा प्रदान करण्यात विलंब केल्याच्या कारणांसह राज्य शासनाला कळविण्यात येईल.

(३) राज्य शासन जिल्हा कार्यक्रम समन्वयकाकडून अहवाल मिळाल्यावर शक्य तितक्या शीघ्रतेने संबंधित कुटुंबाला पोट-कलम (१) अन्वये कळविलेला बेरोजगार भत्ता प्रदान करण्यासाठी सर्व उपाययोजना करील.

विवक्षित परिस्थितीमध्ये बेरोजगार भत्ता मिळण्यास हक्कदार नसणे.

**३-फ .** जो अर्जदार,—

(अ) योजनेखालील त्याच्या कुटुंबाला देण्यात आलेला रोजगार स्वीकारणार नाही ; किंवा

(ब) कामाच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी कार्यक्रम अधिकाऱ्याकडून किंवा अंमलबजावणी अभिकरणांकडून अधिसूचित करण्यात आल्यापासून सात दिवसांच्या आत कामावर उपस्थित होणार नाही ; किंवा

(क) संबंधित अंमलबजावणी अभिकरणाची परवानगी न घेता एका आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी कामावर सतत अनुपस्थित असेल किंवा कोणत्याही महिन्यात एका आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी अनुपस्थित राहिला असेल,

असा कोणताही अर्जदार, तीन महिन्यांच्या कालावधीसाठी या अधिनियमान्वये देय असणारा बेरोजगार भत्ता मागण्यास पात्र नसेल. मात्र, तो या योजनेखाली कोणत्याही वेळी रोजगार मागण्यास पात्र असेल."].

[१][प्रकरण चार

**अंमलबजावणी व संनियंत्रण अभिकरणे**]

राज्य रोजगार हमी परिषद.

[२][**४.** (१) या अधिनियमाच्या अंमलबजावणीचे नियमित संनियंत्रण व पुनरीक्षण करण्याच्या प्रयोजनांसाठी, राज्य शासन, "महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद" या नावाने ओळखली जाणारी एक राज्य परिषद घटित करील आणि या परिषदेचा एक अध्यक्ष असेल व राज्य शासन निश्चित करील इतके शासकीय सदस्य तसेच, पंचायत राज संस्था, कामगार संघटना व लाभवंचित गट यांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले पंधरापेक्षा जास्त नसतील इतके अशासकीय सदस्य असतील :

परंतु असे की, या पोट-कलमान्वये नामनिर्देशित केलेल्या अशासकीय सदस्यांपैकी किमान एक तृतीयांश सदस्य महिला असतील :

परंतु आणखी असे की, या अशासकीय सदस्यांपैकी किमान एक-तृतीयांश सदस्य हे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि अल्पसंख्याक वर्ग यांतील असतील.

(२) ज्या अटी व शर्तींना अधीन राहून, राज्य परिषदेच्या अध्यक्षाची व सदस्यांची नियुक्ती करता येईल अशा अटी व शर्ती, तसेच राज्य परिषदेच्या बैठकीची वेळ, ठिकाण व कार्यपद्धती या बाबी (तिच्या बैठकींसाठी आवश्यक असलेल्या गणपूर्तीसह) विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(३) राज्य परिषदेची कर्तव्ये व कार्ये यांमध्ये पुढील बाबी अंतर्भूत असतील,—

(एक) योजना व तिची अंमलबजावणी यासंबंधातील सर्व बाबींवर राज्य शासनास सल्ला देणे ; अग्रक्रमाने हाती घ्यावयाची कामे निश्चित करणे आणि त्यांची यादी तयार करणे ;

(दोन) हा अधिनियम व त्याखालील योजना यांचे संनियंत्रण आणि गाऱ्हाणी दूर करणारी यंत्रणा यांचा वेळोवेळी आढावा घेणे आणि त्यात सुधारणा सुचविणे ; तसेच हा अधिनियम व त्याखालील योजना यांच्या विषयीच्या माहितीचा शक्य तितक्या व्यापक प्रमाणात प्रसार करणे ;

---

[१] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम १० द्वारे हे शीर्षक समाविष्ट करण्यात आले.

[२] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ याच्या कलम ४ द्वारे कलम ४ हे समाविष्ट करण्यात आले.

(तीन) या अधिनियमाच्या आणि योजनांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे ;

(चार) राज्य शासनामार्फत राज्य विधानमंडळापुढे ठेवावयाचा वार्षिक अहवाल तयार करणे ;

(पाच) राज्य शासन तिला नेमून देईल असे अन्य कोणतेही कर्तव्य किंवा कार्य पार पाडणे.

(४) राज्य परिषदेस, योजनांचे मूल्यमापन करण्याचा आणि या प्रयोजनाकरिता ग्रामीण अर्थव्यवस्थेशी आणि योजनांच्या अंमलबजावणीशी संबंधित आकडेवारी गोळा करण्याचा अथवा गोळा करण्याची व्यवस्था करण्याचा अधिकार असेल.]

[१][(५) राज्य परिषद, विहित करण्यात येईल अशा रीतीने तिची कार्ये पार पाडण्यासाठी, समित्या घटित करील.]

जिल्हा व पंचायत समितीच्या पातळीवरील समित्या व त्यांची कार्ये.

**५.** (१) राज्य शासन, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा रोजगार हमी समिती आणि प्रत्येक पंचायत समितीच्या क्षेत्रात पंचायत समिती रोजगार हमी समिती घटीत करील.

[२][" प्रत्येक जिल्हा पातळीवरील समितीवर आणि पंचायत समिती पातळीवरील समितीवर किमान दोन सदस्य अनुसूचित जाती, अनुसूचीत जमाती व अल्पसंख्याक यांमधील व्यक्तींमधून नियुक्त करण्यात येतील आणि दोन सदस्य ज्यांना योजनेतील कामावर रोजगार देण्यात आला आहे अशा व्यक्तींमधून नियुक्त करण्यात येतील :

परंतु, अशा समित्यांमधील सदस्यांपैकी किमान एक सदस्य ही महिला असेल. ]

(२) या समित्या त्यांच्या संबंधित अधिकारितांमध्ये योजनेच्या अंमलबजावणीवर वेळोवेळी [३][***] तिच्या संबंधात आढावा घेतील आणि या अधिनियमाची अधिक परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी त्यांच्या मते आवश्यक असतील अशा उपाययोजना [४][जिल्हा प्रशासनाला ] [५][***] सुचवतील. [६][***].

---

[१] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ११ द्वारे पोट-कलम (५) जादा दाखल करण्यात आले.

[२] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम १२(अ) द्वारे "प्रत्येक जिल्हा पातळीवरील समितीमधील" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "तिच्या अशासकीय सदस्यांमधून नेमण्यात येईल. " मजकुराने संपणाऱ्या या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १२(ब) (एक) द्वारे "देखरेख ठेवतील व" हा मजकूर वगळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १२(ब) (दोन) द्वारे "राज्य शासनाला" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ४ द्वारे "व परिषदेला" हा मजकूर वगळण्यात आला.

[६] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम १२(ब)(तीन) द्वारे "जिल्हाधिकारी संबंधित समिती अधिकारी" या मजकुराने सुरू होणारा आणि "वेळोवेळी समितीकडे पाठवील" या मजकुराने संपणारा मजकूर वगळण्यात आला.

(३) प्रत्येक जिल्हा पातळीवरील समिती जिल्ह्यातील पंचायत समिती पातळीवरील समित्यांच्या कामकाजाचा समन्वय साधील.

योजनांचे नियोजन व अंमलबजावणी यासाठी प्रमुख प्राधिकरणे.

[१][**६.** (१) या अधिनियमान्वये आखलेल्या योजनांचे नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा परिषद, गटक्षेत्रस्तरावर पंचायत समिती व ग्रामस्तरावर ग्रामपंचायत ही प्रमुख प्राधिकरणे असतील.

(२) जिल्हा परिषदेची कार्ये पुढीलप्रमाणे असतील,—

(अ) योजनेखालील कार्यक्रमांतर्गत गटक्षेत्रावर हाती घ्यावयाच्या प्रकल्पांच्या आखणीला अंतिम रूप देणे आणि त्यांना मान्यता देणे ;

(ब) गटक्षेत्रस्तरावर व जिल्हास्तरावर हाती घेतलेल्या प्रकल्पांचे पर्यवेक्षण करणे व संनियंत्रण करणे ; आणि

(क) राज्य परिषदेकडून तिला वेळोवेळी नेमून देण्यात येतील अशी इतर कार्ये पार पाडणे.

(३) पंचायत समितीची कार्ये पुढीलप्रमाणे असतील,—

(अ) अंतिम मान्यतेसाठी जिल्हा परिषदेकडे पाठविण्यासाठी गटक्षेत्रस्तरीय योजनेला मान्यता देणे ;

(ब) ग्रामपंचायत व गटक्षेत्रस्तरावर हाती घेतलेल्या प्रकल्पांचे पर्यवेक्षण करणे व संनियंत्रण करणे ; आणि

(क) राज्य परिषदेकडून तिला वेळोवेळी नेमून देण्यात येतील अशी इतर कार्ये पार पाडणे.

(४) जिल्हा कार्यक्रम समन्वयक व सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक हे, जिल्हा परिषदेला, या अधिनियमाखालील आणि त्याखाली तयार केलेल्या कोणत्याही योजनेखालील तिची कार्ये पार पाडण्यास सहाय्य करतील.

जिल्हा कार्यक्रम समन्वयक व सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक.

**६-१अ.** (१) जिल्ह्यातील योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्याचा जिल्हाधिकारी किंवा राज्य शासन ठरवील त्याप्रमाणे उचित दर्जाचा इतर कोणताही जिल्हास्तरीय अधिकारी यांस जिल्हा कार्यक्रम समन्वयक म्हणून पदनिर्देशित करण्यात येईल.

(२) जिल्हा कार्यक्रम समन्वयक, या अधिनियमाच्या तरतुदी आणि त्याखाली केलेले नियम या अनुसार जिल्ह्यात योजनेची अंमलबजावणी करण्यास जबाबदार असेल.

(३) जिल्हा कार्यक्रम समन्वयकाची कार्ये पुढीलप्रमाणे असतील,—

(अ) जिल्हा परिषदेला, या अधिनियमाखालील तिची कार्ये आणि त्याखाली केलेल्या कोणत्याही योजना पार पाडण्यास सहाय्य करणे ;

---

[१] वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे मूळ कलम ६ ऐवजी, कलम ६, ६-१अ, ६-१ब, ६-१क, ६-१ड, ६-१इ आणि ६-१फ ही कलमे दाखल करण्यात आली.

(ब) जिल्हा परिषदेकडून मान्यता घ्यावयाच्या प्रकल्पांच्या सूचीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी गटक्षेत्रांनी तयार केलेल्या योजना आणि इतर अंमलबजावणी अभिकरणांकडून प्राप्त झालेले प्रकल्प प्रस्ताव एकत्रित करणे ;

(क) जेथे आवश्यक असेल तेथे आवश्यक ती मंजुरी देणे आणि प्रशासकीय मान्यता देणे ;

(ड) या अधिनियमान्वये अर्जदार ज्या रोजगारासाठी हक्कदार आहेत त्यांना तसा रोजगार पुरविला आहे याची खात्री करण्यासाठी त्याच्या अधिकारितेत कार्य करणाऱ्या कार्यक्रम अधिकाऱ्यांशी आणि अंमलबजावणी करणाऱ्या अभिकरणांशी समन्वय साधणे ;

(इ) कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या कामगिरीचा आढावा घेणे, त्याबाबत सनियंत्रण ठेवणे व पर्यवेक्षण करणे ;

(फ) चालू असणाऱ्या कामांचे नियतकालिक निरीक्षण करणे ; आणि

(ग) अर्जदारांची गाऱ्हाणी दूर करणे.

(४) जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा राज्य शासन ठरवील असा समुचित दर्जाचा इतर कोणताही जिल्हास्तरीय अधिकारी यांस, सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक म्हणून पदनिर्देशित करण्यात येईल. सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक हा, संबंधित जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायती यांच्या बाबतीत जिल्हा कार्यक्रम समन्वयकाला योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी व या अधिनियमाखालील आणि त्याखालील तयार केलेल्या कोणत्याही योजनेखालील त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी सहाय्य करील.

(५) राज्य शासन, जिल्हा कार्यक्रम समन्वयक व सह जिल्हा कार्यक्रम समन्वयकाला त्यांची या अधिनियमाखालील कार्ये पार पाडणे शक्य व्हावे म्हणून आवश्यक असतील असे प्रशासकीय व वित्तीय अधिकार त्यांच्याकडे सोपवील.

(६) जिल्ह्यापेक्षा मोठ्या नसणाऱ्या क्षेत्रात आपली अधिकारिता असणारा राज्य शासनाचा कार्यक्रम अधिकारी व इतर सर्व अधिकारी आणि जिल्ह्यात कार्यरत असणारी स्थानिक प्राधिकरणे व संस्था, जिल्हा कार्यक्रम समन्वयकास या अधिनियमाखालील कार्ये आणि या अधिनियमाखाली तयार केलेल्या योजना पार पाडण्यासाठी सहाय्य करण्यास जबाबदार असतील.

(७) जिल्हा कार्यक्रम समन्वयक, जिल्ह्यातील अंग मेहनतीच्या अकुशल कामांसाठी कामगारांच्या अपेक्षित मागणीचा तपशील आणि या योजनेमध्ये समाविष्ट केलेल्या कामांवर किती कामगारांना रोजगार पुरवता येईल याबाबतची तपशीलवार योजना अंतर्भूत असणारे पुढील वित्तीय वर्षासाठीचे कामगारविषयक अंदाजपत्रक (लेबर बजेट) प्रत्येक वर्षाच्या डिसेंबर महिन्यात तयार करील आणि ते जिल्हा परिषदेला सादर करील.

कार्यक्रम अधिकारी, सह कार्यक्रम अधिकारी, अपर कार्यक्रम अधिकारी व विशेष कार्यक्रम अधिकारी.

**६-१ब.** (१) तालुक्यातील योजनेच्या अंमलबजावणीसाठी तहसीलदार किंवा राज्य शासन ठरवील अशाप्रमाणे समुचित दर्जाचा इतर कोणताही अधिकारी यांस, कार्यक्रम अधिकारी म्हणून पदनिर्देशित करण्यात येईल. पंचायत समितीचा गटविकास अधिकारी किंवा राज्य शासन ठरवील त्याप्रमाणे उचित दर्जाचा कोणताही इतर तालुकास्तरावरील अधिकारी यांस, सह कार्यक्रम अधिकारी म्हणून पदनिर्देशित करण्यात येईल :

परंतु असे की, राज्य शासनास, पंचायत समिती क्षेत्रातील कोणत्याही ग्रामीण क्षेत्राकरिता समुचित दर्जाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला अतिरिक्त किंवा विशेष कार्यक्रम अधिकारी म्हणून पदनिर्देशित करता येईल.

(२) कार्यक्रम अधिकारी आणि सह कार्यक्रम अधिकारी हे, राज्य शासनाकडून किंवा जिल्हा कार्यक्रम समन्वयकाकडून आदेशाद्वारे निदेशित करण्यात येईल अशा रीतीने, पंचायत समितीला या अधिनियमाखालील आणि त्याअन्वये तयार केलेल्या कोणत्याही योजनेखालील आपली कार्ये पार पाडण्यात सहाय्य करतील.

(३) कार्यक्रम अधिकारी, आपल्या अधिकारितेत येणाऱ्या क्षेत्रातील प्रकल्पांतून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधीशी रोजगाराच्या मागणीची सांगड घालण्यास जबाबदार असेल.

(४) कार्यक्रम अधिकारी, ग्रामपंचायतींनी तयार केलेले प्रकल्प प्रस्ताव आणि पंचायत समितीकडून प्राप्त झालेले प्रस्ताव एकत्रित करून, त्याच्या अधिकारितेखालील गट क्षेत्रासाठी एक योजना तयार करील.

(५) कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या कार्यांमध्ये पुढील बाबींचा समावेश असेल :—

(अ) गटातील ग्रामपंचायतींनी आणि इतर अंमलबजावणी अभिकरणांनी हाती घेतलेल्या प्रकल्पांचे संनियंत्रण करणे ;

(ब) पात्र कुटुंबांना बेरोजगार भत्ता मंजूर करणे व त्याचे प्रदान सुनिश्चित करणे ;

(क) गट क्षेत्रामधील योजनेच्या कार्यक्रमांतर्गत कामावर लावलेल्या सर्व मजुरांना सत्वर आणि न्याय्य वेतन देण्याचे सुनिश्चित करणे ;

(ड) ग्रामपंचायतीच्या अधिकारितेतील सर्व कामांचे ग्रामसभेकडून नियमित सामाजिक अंकेक्षण केले जात असल्याचे आणि त्या सामाजिक अंकेक्षणात घेण्यात आलेल्या आक्षेपांबाबत त्वरित कार्यवाही केली जात असल्याचे सुनिश्चित करणे ;

(इ) गट क्षेत्रातील योजनेच्या अंमलबजावणीच्या संबंधात उपस्थित होतील अशा सर्व तक्रारींवर तत्परतेने कार्यवाही करणे ; आणि

(फ) जिल्हा कार्यक्रम समन्वयक आणि सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांच्याकडून किंवा राज्य शासनाकडून त्याला नेमून देण्यात येतील अशी इतर कोणतीही कामे.

(६) कार्यक्रम अधिकारी, सह कार्यक्रम अधिकारी, अपर कार्यक्रम अधिकारी आणि विशेष कार्यक्रम अधिकारी हे, जिल्हा कार्यक्रम समन्वयकाचे निदेश, नियंत्रण आणि पर्यवेक्षण याखाली कार्य करतील.

(७) राज्य शासनास, आदेशाद्वारे, कार्यक्रम अधिकाऱ्याची सर्व किंवा त्यापैकी कोणतीही कार्ये, सह कार्यक्रम अधिकारी, अपर कार्यक्रम अधिकारी किंवा विशेष कार्यक्रम अधिकारी पार पाडील, असा निदेश देता येईल.

(८) पोट-कलम (७) च्या तरतुदींना बाध न येता, राज्य शासनास, आदेशाद्वारे, कार्यक्रम अधिकारी, सह कार्यक्रम अधिकारी, अपर कार्यक्रम अधिकारी आणि विशेष कार्यक्रम अधिकारी यांची सर्व किंवा त्यापैकी कोणतीही कार्ये ग्रामपंचायत किंवा स्थानिक प्राधिकरण पार पाडील, असा निदेश देता येईल.

(९) सह कार्यक्रम अधिकारी, संबंधित पंचायत समितीच्या आणि ग्रामपंचायतीच्या बाबतीत या अधिनियमाखालील आणि त्याअन्वये केलेल्या योजनेखालील आपली कार्ये पार पाडण्यासाठी योजनेच्या अंमलबजावणीत कार्यक्रम अधिकारी, सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक आणि जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांना सहाय्य करील.

**६-१क.** (१) ग्रामपंचायत, तिच्या क्षेत्रामध्ये अशी कामे पार पाडण्यासाठी आणि त्यांचे पर्यवेक्षण करण्यासाठी ग्रामसभेच्या शिफारशींनुसार एखाद्या योजनेअंतर्गत हाती घ्यावयाच्या प्रकल्पांची निवड करण्यासाठी जबाबदार असेल. ग्रामपंचायतींच्या जबाबदाऱ्या.

(२) ग्रामपंचायतीस, कार्यक्रम अधिकाऱ्याकडून मंजूर करण्यात येईल असा, ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील एखाद्या योजने अंतर्गत कोणताही प्रकल्प हाती घेता येईल.

(३) प्रत्येक ग्रामपंचायत, ग्रामसभेच्या शिफारशी विचारात घेतल्यानंतर विकास योजना तयार करील आणि जसजशी कामाची मागणी होईल तसतशी त्या योजने अंतर्गत हाती घ्यावयाच्या संभाव्य कामांचे एक कोष्टक (शेल्फ) तयार ठेवील.

(४) ग्रामपंचायत, ज्या वर्षामध्ये विकास प्रकल्पाचे काम सुरू करण्याचे प्रस्तावित केले आहे त्या वर्षाच्या प्रारंभापूर्वी, आपले विकास प्रकल्पांचे प्रस्ताव आणि त्यातील निरनिराळ्या कामांमधील प्राथम्यक्रम छाननीसाठी आणि प्राथमिक मान्यतेसाठी कार्यक्रम अधिकाऱ्याकडे पाठवील.

(५) कार्यक्रम अधिकारी, एखाद्या योजने अंतर्गत कामांच्या खर्चानुसार ग्रामपंचायतीद्वारा पार पाडावयाच्या कामांच्या कमीत कमी पन्नास टक्के इतकी कामे नेमून देईल.

(६) कार्यक्रम अधिकारी, प्रत्येक ग्रामपंचायतीला,—

(अ) मंजूर कामे सुरू करण्यासाठी हजेरीपट पुरवील ; आणि

(ब) त्या ग्रामपंचायतीच्या रहिवाशांना अन्यत्र उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संधींची सूची पुरवील.

(७) ग्रामपंचायत, अर्जदारांमध्ये रोजगाराच्या संधी वाटून देईल आणि त्यांना कामावर उपस्थित होण्यास सांगील.

(८) ग्रामपंचायतीने या योजनेअन्वये हाती घेतलेली कामे, आवश्यक ते तांत्रिक मापदंड (मानके) व मोजमापे यांनुसार असतील.

**६-१ड.** (१) ग्रामसभा, ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील कामांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करील. ग्रामसभेने कामाचे सामाजिक अंकेक्षण करणे.

(२) ग्रामसभा, ग्रामपंचायत क्षेत्रात हाती घेण्यात येणाऱ्या योजनेखालील सर्व प्रकल्पांचे सामाजिक अंकेक्षण करील.

(३) ग्रामपंचायत, सामाजिक अंकेक्षण करण्याच्या प्रयोजनार्थ ग्राम सभेला, हजेरीपट, देयके, प्रमाणके, मोजणी पुस्तके, मंजुरी आदेशांच्या प्रती आणि इतर संबंधित लेखा पुस्तके व कागदपत्रे यांसह सर्व संबंधित कागदपत्रे उपलब्ध करून देईल.

योजनेची अंमलबजावणी करताना राज्य शासनाने पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या.

**६-१इ.** राज्य शासन, जिल्हा कार्यक्रम समन्वयक, सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक,कार्यक्रम अधिकारी, सह कार्यक्रम अधिकारी, अपर कार्यक्रम अधिकारी आणि विशेष कार्यक्रम अधिकारी यांना आवश्यक तो कर्मचारीवर्ग आणि योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक असेल असे तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देईल.

गाऱ्हाणी निवारण यंत्रणा.

**६-१फ.** राज्य शासन, नियमांद्वारे, योजनेच्या अंमलबजावणी संबंधात कोणत्याही व्यक्तीने केलेल्या कोणत्याही तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी गट पातळीवर आणि जिल्हा पातळीवर समुचित गाऱ्हाणी निवारण यंत्रणा निर्धारित करील आणि अशा तक्रारी निकालात काढण्याची कार्यपद्धती घालून देईल.]

[1][* * * * * *]

इतरत्र रोजगार असताना बेकारी भत्ता घेतल्याबद्दल शास्ती.

**९.** कोणतीही व्यक्ती,—

(अ) जिच्याकडे रोजगार असेल परंतु जी व्यक्ती, [2][कलम ३ च्या, पोट-कलम (२) अन्वये] रोजगार मिळण्यासाठी पत्र पाठवील व [3][कलम ३ड च्या पोट-कलम (१)] अन्वये बेकारी भत्ता घेईल ; किंवा

(ब) जिला [4][कलम ३-ड च्या पोट-कलम (१)] अन्वये बेकारी भत्ता मिळत असेल आणि जी इतर ठिकाणी रोजगार स्वीकारील परंतु ही वस्तुस्थिती [5][कार्यक्रम अधिकाऱ्याच्या] निदर्शनास आणून देणार नाही व त्या पोट-कलमान्वये बेकारी भत्ता घेण्याचे चालू ठेवील,

त्या व्यक्तीला अपराध सिद्ध झाल्यावर, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

[6][* * * * * *]

---

[1] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम १५ द्वारे ७, ७अ व ८ ही कलमे वगळण्यात आली.

[2] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम १६(एक) (क) द्वारे "कलम ८, पोट-कलम (३) अन्वये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १६(एक) (ख) द्वारे "त्या कलमाच्या पोट-कलम (४)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १६(दोन) (क) द्वारे "कलम ८, पोट-कलम (४)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम १६(दोन) (ख) द्वारे "समिती अधिकाऱ्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे कलमे १० व ११ वगळण्यात आली.

[१][प्रकरण पाच

## रोजगार हमी निधी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र, यांची स्थापना, पारदर्शकता व उत्तरदायित्व आणि लेखा परीक्षा]

रोजगार हमी निधीची स्थापना आणि योजनेसाठी त्याचा वापर करणे.

**१२.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास रोजगार हमी निधी म्हणून संबोधावयाचा एक निधी स्थापन करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

१९७५ चा महा. १६. १९७५ चा महा. १७.

(२) महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ व महाराष्ट्र कर (सुधारणा) अधिनियम, १९७५ याअन्वये स्थापन करण्यात आलेल्या रोजगार हमी निधीमध्ये जमा असलेली कोणतीही रक्कम या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून पोट-कलम (१) अन्वये स्थापन करण्यात आल्याचे मानण्यात येणाऱ्या निधीमध्ये हस्तांतरित होईल आणि ती रक्कम त्याचा भाग होईल.

(३) पुढील गोष्टी त्या निधीचा भाग होतील किंवा त्यामध्ये भरण्यात येतील :—

१९७५ चा महा. १६.

[२][(अ) महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ याच्या कलम ३० अन्वये निधीमध्ये हस्तांतरित केलेल्या रकमा ;]

(ब) राज्य शासनाने, [३][***] किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने दिलेली कोणतीही अंशदाने किंवा अनुदाने ;

[४]* * * * * * *

(क) इतर संस्थांकडून किंवा व्यक्तींकडून-मग त्या विधिसंस्थापित असोत वा नसोत- मिळालेल्या कोणत्याही रकमा.

[५][(३अ) राज्य शासन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी लागेल तेवढ्या निधीची तरतूद करील.]

(४) निधीमध्ये हस्तांतरित केलेली किंवा जमा केलेली कोणतीही रक्कम ही, राज्याच्या एकत्रीकृत निधीवरील भारित रक्कम म्हणून राहील.

(५) निधीमध्ये जमा असलेली रक्कम, [६][या अधिनियमाअन्वये तरतूद केल्याप्रमाणे प्रशासनिक खर्च भागविणे व सानुग्रह प्रदान करणे या बाबी धरून] या योजनेच्या अंमलबजावणीच्या

---

[१] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम १८ द्वारे हे शीर्षक समाविष्ट करण्यात आले.

[२] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १४ (क) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[३] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनिमय क्रमांक २६ याच्या कलम १९(एक) द्वारे "केंद्र सरकारने" हा मजकूर वगळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १९(दोन) द्वारे खंड (ब-१) वगळण्यात आला.

[५] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १४ (ब) द्वारे पोट-कलम (३अ) जादा दाखल करण्यात आले.

[६] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ३ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

प्रयोजनासाठी विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा शर्तींना अधीन राहून, खर्च करण्यात येईल.

(६) रोजगार निर्माण करणे किंवा उत्पादक मत्तांची निर्मिती करणे किंवा ही दोन्हीही ज्यांची उद्दिष्टे आहेत अशा इतर विभागीय योजना किंवा योजनांतर्गत योजना यांच्याकरिता वापरण्यासाठी निधी तात्पुरता वळविण्यात राज्य शासनास, त्या किंवा पुढील वित्तीय वर्षामध्ये अशा रकमेद्वारे निधीची प्रतिपूर्ती करण्यात येईल, या शर्तीच्या अधीन राहून, परवानगी देता येईल.

(७) हा निधी, राज्य शासनाच्या सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या एखाद्या अधिकाऱ्याला राज्य शासनाकडून वेळोवेळी देण्यात येतील अशा सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांच्या अधीन राहून, राज्य शासनाच्या वतीने ठेवता येईल आणि त्याची व्यवस्था पाहता येईल.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र.

[1][**१२-अ.** (१) राज्य शासन, केंद्रीय अधिनियमाच्या कलम २१ अन्वये आवश्यक केल्याप्रमाणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र म्हणून संबोधण्यात येणारा एक निधी घटित करील. अशाप्रकारचा निधी हा, कलम १२ अन्वये घटित केलेल्या रोजगार हमी निधीचा भाग असणार नाही.

(२) केंद्रीय अधिनियमाच्या कलम २८ अन्वये मिळालेली कोणतीही रक्कम आणि केंद्रीय अधिनियमाच्या कलम २२ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे राज्य शासनाचे अंशदान हे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र यामध्ये जमा करण्यात येईल.

(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र यामध्ये जमा असलेली रक्कम या अधिनियमाच्या अंमलबजावणी प्रयोजनार्थ राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा अटी व शर्तींच्या अधीन राहून खर्च करण्यात येईल.

(४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी, महाराष्ट्र विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा प्राधिकरणाकडून राज्य शासनाच्या वतीने धारण करण्यात येईल व त्याचे व्यवस्थापन करण्यात येईल.

(५) केंद्रीय अधिनियमाखालील योजने अंतर्गत हाती घेतलेले काम पूर्ण झाल्यावर, जर उक्त कामाचा तांत्रिक दर्जावाढ किंवा त्याचे मूल्यवर्धन करण्यासाठी त्या पूर्ण झालेल्या कामाचे आणखी कुशल काम हाती घेणे आवश्यक असेल तर, राज्य शासनास ते काम पूर्ण करण्यासाठी आवश्यकता किंवा तरतूद म्हणून पूरक निधीची तरतूद करता येईल.

पारदर्शकता व उत्तरदायित्व.

**१२-ब.** (१) जिल्हा कार्यक्रम समन्वयक, सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक आणि जिल्ह्यातील सर्व अंमलबजावणी अभिकरणे, एखाद्या योजनेची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ त्यांच्या ताब्यात असलेल्या निधींचा यथोचित वापर करण्यास आणि त्यांचे व्यवस्थापन करण्यास जबाबदार असतील.

(२) राज्य शासनास, मजुरांच्या रोजगारांसंबंधीची आणि या अधिनियमाच्या तरतुदींच्या आणि त्याखाली केलेल्या योजनांच्या अंमलबजावणीसंबंधात केलेल्या खर्चासंबंधीच्या नोंदवह्या व लेखे ठेवण्याची रीत विहित करता येईल.

---

[1] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम २० द्वारे कलमे १२-अ ते १२-क, प्रकरण सहा व कलम १२-ड आणि प्रकरण सात व कलम १२-इ समाविष्ट करण्यात आले.

(३) राज्य शासनास, नियमांद्वारे, योजनांची आणि त्या योजनांखालील कार्यक्रमांची यथोचित अंमलबजावणी करण्याची आणि त्या योजनांची अंमलबजावणी करताना सर्व पातळीवरील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्याची व्यवस्था निर्धारित करता येईल.

(४) ग्रामपंचायतीकडून करण्यात येणाऱ्या एखाद्या योजनेच्या अंमलबजावणीसंबंधी कोणताही विवाद किंवा तक्रार उद्‌भवल्यास, ती बाब कार्यक्रम अधिकाऱ्याकडे किंवा, यथास्थिती, सह कार्यक्रम अधिकाऱ्याकडे निर्देशित करण्यात येईल.

(५) कार्यक्रम अधिकारी, त्याने ठेवलेल्या तक्रार नोंदवहीत प्रत्येक तक्रारीची नोंद करील आणि ती मिळाल्याच्या दिनांकापासून सात दिवसाच्या आत त्यासंबंधिच्या विवादांवर आणि तक्रारींवर निकाल देईल आणि जर ती तक्रार इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याने मिटवावयाच्या एखाद्या बाबीशी संबंधित असेल तर, तक्रारदाराला तसे कळवून ती तक्रार अशा प्राधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल.

लेख्यांची लेखापरीक्षा.

**१२-क.** (१) राज्य शासनास, भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक याच्याशी विचारविनिमय करून, योजनेच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्याकरिता सर्व स्तरांवरील समुचित व्यवस्था विहित करता येईल.

(२) योजनेचे लेखे, राज्य शासन विहित करील अशा नमुन्यात व अशा रीतीने ठेवण्यात येतील.

प्रकरण सहा

## नागरी क्षेत्रांतील योजना

नागरी क्षेत्रांमध्ये योजनेची अंमलबजावणी करणे.

**१२-ड.** राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नागरी क्षेत्रांमध्ये योजनेची अंमलबजावणी करता येईल आणि त्या प्रयोजनार्थ, कलम ३-अ अन्वये तयार करण्यात आलेल्या योजनेमध्ये आवश्यक वाटतील असे फेरबदल करता येतील.

प्रकरण सात

## खाजगी जमिनींवरील योजना

विशिष्ट परिस्थितीत खाजगी जमिनींचे लाभार्थी अर्थसहाय्य मिळण्यास हक्कदार असणे.

**१२-इ.** (१) एखाद्या योजने अंतर्गत खाजगी जमिनीवर कामे हाती घेण्यात आल्याच्या परिणामी, त्या जमिनीच्या धारकाला थेट लाभ होत असेल तेव्हा, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये किंवा कोणत्याही कार्यकारी आदेशामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, तो धारक, राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा दराने अर्थसहाय्य मिळण्यास हक्कदार असेल.

(२) पोट-कलम (१) खालील अर्थसहाय्य, कलम १२ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या राज्य रोजगार हमी निधीतून आणि त्या निधीच्या सहाय्याने प्रदान करण्यात येईल.]

विवक्षित अधिनियमांतील सुधारणा व इतर कायद्यांमधील योजना व निधी यांच्या निर्देशांचा अन्वयार्थ लावण्यासाठी नियम.

**१३.** (१) [1][अनुसूची एकच्या] दुसऱ्या स्तंभामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले अधिनियम, तिच्या तिसऱ्या स्तंभामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रीतीने आणि त्या मर्यादेपर्यंत याद्वारे सुधारण्यात येत आहेत.

(२) महाराष्ट्र राज्यातील त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामधील किंवा कोणत्याही संलेखांमधील रोजगार हमी योजना किंवा राज्य शासनाचा निधी यासंबंधीच्या सर्व निर्देशांचा अन्वयार्थ या अधिनियमाखालील योजना किंवा यथास्थिति, निधी असल्याप्रमाणे लावण्यात येईल.

[2][प्रकरण आठ

**संकीर्ण**]

प्रत्येक विभागातील योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्याचे व आढावा घेण्याचे आयुक्तांचे अधिकार.

[3][**१३-अ.** (१) विभागाचा आयुक्त किंवा याबाबतीत त्याने पदनिर्देशित केलेला [4][उप-आयुक्ताच्या] दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसणारा कोणताही अधिकारी किंवा कोणतेही अधिकारी, त्या विभागीय योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यास आणि तिचा आढावा घेण्यास सक्षम असेल किंवा असतील. आयुक्त योजनेच्या अंमलबजावणीबाबत [5][त्या विभागातील जिल्हा कार्यक्रम समन्वयक, सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक, कार्यक्रम अधिकारी, सह कार्यक्रम अधिकारी, अपर कार्यक्रम अधिकारी, विशेष कार्यक्रम अधिकारी आणि अंमलबजावणी अभिकरणांचे (विभागीय पातळीवरील अधिकाऱ्यांसह) इतर सर्व अधिकारी, स्थानिक प्राधिकरणे व इतर संस्था यांना] निदेश देण्यास सक्षम असेल आणि अशा निदेशांचे पालन करणे हे त्या सर्वांचे अवश्य कर्तव्य असेल.

(२) योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनार्थ [6][विभागातील जिल्हा कार्यक्रम समन्वयक, सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक, कार्यक्रम अधिकारी, सह कार्यक्रम अधिकारी, अपर कार्यक्रम अधिकारी, विशेष कार्यक्रम अधिकारी आणि अंमलबजावणी करणाऱ्या अभिकरणांचे (विभागीय पातळीवरील अधिकाऱ्यांसह) इतर सर्व अधिकारी, स्थानिक प्राधिकरणे व इतर संस्था यांना] राज्य शासन निर्देश देईल अशा मर्यादेपर्यंत आणि अशा रीतीने आयुक्तास जबाबदार व अधीन असतील.]

---

[1] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनिमय क्रमांक ५१ याच्या कलम ७ द्वारे "अनुसूचीच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम २१ द्वारे वरील शीर्षक समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आलेल्या कलम ६-अ यास, सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम १४ द्वारे कलम १३-अ असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[4] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम १४ (एक) (क) द्वारे "सहायक आयुक्ताच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम १४ (एक) (ख) द्वारे "जिल्हाधिकाऱ्याला, (विभागीय पातळावरील अधिकाऱ्यांसह) इतर अधिकाऱ्यांना स्थानिक प्राधिकरणांना आणि इतर संस्थांना" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम १४(दोन) द्वारे "विभागातील जिल्हाधिकारी, इतर अधिकारी, स्थानिक प्राधिकरणे आणि इतर संस्था" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(३) कोणत्याही क्षेत्रातील योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्याचे व तिचा आढावा घेण्याचे विभागीय आयुक्ताचे अधिकार, राज्य शासन, समुचित दर्जाच्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याकडे सुपूर्द करू शकेल.]

**१४.** राज्य शासनाला, **राजपत्रातील,** अधिसूचनेद्वारे, असा निदेश देता येईल की, शासनाने वापरण्याजोगी, योजना आणि नियम [२] [* * * *] तयार करण्याच्या अधिकारांव्यतिरिक्त इतर अधिकार हे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी परिस्थिती व शर्ती, कोणत्याही असल्यास, त्या परिस्थितीमध्ये व त्या शर्तीअन्वये, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा त्याला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्यांनी देखील वापरण्याजोगे असतील. अधिकार सोपवणे.

[३][**१४अ.** जो कोणी, कलम ९ खालील शास्ती खेरीज, या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करील, तो, दोष सिद्ध झाल्यानंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल. [४][आणि संबंधित सेवा नियमांनुसार व केंद्रीय अधिनियमाच्या कलम २७ अन्वये केंद्र सरकारने दिलेल्या निर्देशांनुसार शिस्तभंगाच्या कारवाईसदेखील पात्र असेल.]] शास्ती.

**१५.** हा अधिनियम किंवा त्याखाली तयार करण्यात आलेली योजना किंवा नियम यांनुसार सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी राज्य शासन किंवा कोणतेही प्राधिकरण किंवा अधिकारी किंवा संस्था किंवा व्यक्ती यांविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

**१६.** या अधिनियमाच्या किंवा त्याखाली तयार केलेली योजना, नियम किंवा काढलेली अधिसूचना किंवा आदेश, यांच्या तरतुदी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये किंवा अशा कायद्याच्या आधारे परिणामक असणाऱ्या कोणत्याही संलेखामध्ये त्याच्याशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, परिणामक असतील. अधिनियमाचा अधिभावी परिणाम असणे.

**१६अ.** [५][(१)] राज्य शासनास, वेळोवेळी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूची दोन किंवा अनुसूची तीन मध्ये कोणतीही नोंद जादा दाखल करून किंवा त्यांमधील कोणत्याही नोंदीमध्ये फेरबदल करून किंवा कोणतीही नोंद वगळून त्यात सुधारणा करता येईल आणि त्यानंतर, उक्त अधिसूचनेमध्ये त्यानुसार सुधारणा करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल : अनुसूची दोन व तीन यांमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार.

[६][परंतु, अशा प्रकारे सुधारण्यात आलेली अनुसूची ही, केंद्रीय अधिनियमाच्या त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अनुसूची एक किंवा, यथास्थिती, अनुसूची दोन मध्ये नमूद केलेल्या किमान शर्ती तसेच किमान हक्क यांच्याशी सुसंगत असतील.]

---

[१] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या १४ (तीन) द्वारे "पोट-कलम (३)" दाखल करण्यात आले.

[२] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ४ द्वारे "आणि कलम १२, पोट-कलम (६) मध्ये निर्दिष्ट केलेली, सुशिक्षित बेकारांसाठी योजना" हा मजकूर वगळण्यात आला.

[३] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ याच्या कलम ८ द्वारे "कलम १४अ" जादा दाखल करण्यात आला.

[४] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम २२ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २३ अन्वये कलम १६अ याला पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २३(एक) द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[१][(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या प्रत्येक अधिसूचनेची प्रत ती काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवण्यात येईल.]

[२]* * * * * * *

नियम करण्याचे अधिकार.

**१७.** (१) या अधिनियमान्वये नियम करावयाचे अधिकार, राज्य शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वापरण्यायोग्य असतील.

(२) या अधिनियमामध्ये इतरत्र अंतर्भूत असलेल्या नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारांना बाध न येऊ देता, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी राज्य शासनाला या अधिनियमाशी सुसंगत असे नियम करता येतील.

(३) या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन असतील.

(४) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनांत मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील, आणि असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, ती अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून, तो नियम केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये यापूर्वी करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

---

[१] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम २३(दोन) हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २४ द्वारे कलम “१६ब” वगळण्यात आले.

## [१] [ **अनुसूची एक** ]

(कलम १३ पहा)

| | अनु-क्रमांक | अधिनियमाचे संक्षिप्त नाव व क्रमांक | सुधारणा |
|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) |
| १९७८ चा महा. २०. | १ | मुंबई विक्रीकर, अधिनियम, १९५९ (सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१). | कलम **१५अ**-एक मधील, "महाराष्ट्र राज्यात" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अन्वये," हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| १९७८ चा महा. २०. | २ | महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उप कर) अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७). | कलम **६-अ** मधील, "महाराष्ट्र राज्याच्या" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अन्वये," हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| १९७८ चा महा. २०. | ३ | महाराष्ट्र जमीन महसूल व विशेष आकारणी यांमध्ये वाढ करण्याबाबत अधिनियम, १९७४ (सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०). | कलम ३ मधील, "महाराष्ट्र राज्यात" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अन्वये," हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| १९७८ चा महा. २०. | ४ | महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६). | कलम ३० च्या—<br>(अ) पोट-कलम (१) मधील,—<br>(एक) " या अधिनियमाच्या प्रारंभानंतर रोजगार हमी निधी नावाचा एक निधी स्थापन करण्यात येईल," हा मजकूर वगळण्यात येईल.<br>(दोन) " त्या निधीकडे हस्तांतरित, " या मजकुराऐवजी "महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अन्वये स्थापन केलेल्या रोजगार हमी निधीकडे हस्तांतरित," हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(ब) पोट-कलम (२) मधील, "पोट-कलम (१) अन्वये निधीकडे हस्तांतरित |

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ याच्या कलम १० द्वारे " अनुसूची " या शीर्षकाऐवजी हे शीर्षक दाखल करण्यात आले.

**अनुसूची—**चालू

| अनु क्रमांक | अधिनियमाचे संक्षिप्त नाव व क्रमांक | सुधारणा | |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | |
| | | केलेल्या रकमे-इतक्या रकमेचे अंशदान त्या निधीस” या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—<br>“पोट-कलम (१) अन्वये त्या निधीकडे हस्तांतरित केलेल्या रकमेइतके अंशदान रोजगार हमी निधीस”;<br>(क) पोट-कलमे (३), (४), (५) आणि (६) वगळण्यात येतील.<br>(ड) समास टीपेऐवजी, पुढील सामास टीप दाखल करण्यात येईल :–<br>“महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अन्वये स्थापन केलेल्या निधीत कराच्या निव्वळ उत्पन्नाइतकी रक्कम व अनुरूप अंशदान देणे”. | १९७८ चा महा. २०. |
| ५ | महाराष्ट्र कर अधिनियम (सुधारणा) अधिनियम, १९७५ (सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७). | कलम ४ च्या,–<br>(अ) पोट-कलम (१) मधील, “महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ याच्या कलम ३० अन्वये ” या मजकुराऐवजी, “महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अन्वये ” हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(ब) पोट-कलमे (३) आणि (४) ही वगळण्यात येतील. | १९७८ चा महा. २०. |

[1] [**अनुसूची दोन**

(कलम ३अ(३) पहा)

ग्रामीण रोजगार हमी योजनेची किमान वैशिष्ट्ये

**१.** (एक) योजनेखाली केवळ उत्पादक कामेच हाती घेतली जातील :

परंतु असे की, अतिवृष्टी, पूर, भूकंप, अवर्षण, टंचाई किंवा वादळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी म्हणून कोणत्याही कामांसाठी कोणत्याही क्षेत्रात रोजगार पुरविणे आवश्यक आहे असे राज्य शासनाचे मत असल्यास, राज्य शासन वेळोवेळी ठरवील त्याप्रमाणे, अशा तात्पुरत्या कालावधीसाठी, राज्य शासनास, उक्त योजनेखाली अशी कामे हाती घेण्यास परवानगी देता येईल ;

(दोन) योजनेत, शक्य असेल तेथवर, अकुशल कामगारांकरिता कुशलतेच्या प्रशिक्षणाची आणि कुशलतेच्या दर्जात दर्जावाढ करण्यासाठीही तरतूद करता येईल.

**२.** योजनेची मूलभूत वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(अ) ग्रामीण क्षेत्रांमध्ये प्रत्येक कुटुंबाला मागणीनुसार एका वित्तीय वर्षामध्ये केंद्रीय अधिनियमाच्या अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपेक्षा कमी नसेल एवढ्या कालावधीकरिता हमी दिलेल्या रोजगाराच्या स्वरूपात अकुशल अंगमेहनतीचे काम पुरवून त्याद्वारे विहित दर्जाच्या टिकाऊ उत्पादक मत्ता निर्माण करणे ;

(ब) गोरगरीबांच्या उपजीविकेच्या संसाधनाचा पाया मजबूत करणे ;

(क) सामाजिक सहभागाची सकारात्मकपणे सुनिश्चिती करणे ;

(ड) पंचायत राज संस्था बळकट करणे :

परंतु, या अधिनियमाद्वारे अथवा त्याअन्वये आणि योजनेमध्ये निर्धारित केलेल्या शर्तींच्या अधीनतेने प्रौढ सदस्य अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी स्वतः होऊन तयार असतील त्या बाबतीत उक्त उद्दिष्टे लागू असतील.

**३.** (१) पुढीलप्रमाणे वर्गीकरण केलेल्या कामांवर योजनेचा मुख्य भर असेल :—

एक. प्रवर्ग-अ : नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सार्वजनिक बांधकामे–

(एक) पेयजल स्त्रोतांसह भूजलाचे पुनर्भरण करण्यावर विशेष भर देऊन भूमिगत पाट, मातीची धरणे, रोधी धरणे, संरोधी धरणे यांसारखी भूजल स्तर वाढविणारी व त्यात सुधारणा करणारी जल संधारणाची व जल संचयाची बांधकामे ;

(दोन) व्यापक पाणलोट क्षेत्र प्रक्रिया करता येईल असे समतल चर, मजगी घालणे, समतल बांध, दगडी संरोधक, दगडमातीचे कक्षबांध (गॅबियन संरचना) आणि पाणलोट विकासाची कामे यांसारखी जलव्यवस्थापनविषयक कामे ;

(तीन) सूक्ष्म व लघू पाटबंधाऱ्याची कामे आणि सिंचन कालवे व नाली बांधणे, त्यांचे नूतनीकरण करणे व परिरक्षण करणे ;

---

[1] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम २५ द्वारे अनुसूची दोन व अनुसूची तीन ऐवजी या अनुसूच्या दाखल करण्यात आल्या.

(चार) सिंचन तलाव व इतर जलाशये यांमधील गाळ उपसण्यासह पारंपारिक जलाशयांचे नूतनीकरण करणे ;

(पाच) परिच्छेद ४ मध्ये अंतर्भूत असलेल्या कुटुंबांना फलोपयोग घेण्याचा रीतसर हक्क मिळवून देईल असे, सर्व सामान्य व वन जमिनींवरील सडक पट्ट्या, कालवा बांध, तलाव अग्रतट (टँक फोरशोअर) आणि किनारी पट्टे यावरील वनरोपण, वृक्ष लागवड आणि फलोत्पादन ;

(सहा) सामुहिक जमिनीवरील भूविकासाची कामे.

दोन . प्रवर्ग-ब : दुर्बल घटकांकरिता व्यक्तिगत मत्ता (फक्त परिच्छेद ४ मध्ये उल्लेखिलेल्या कुटुंबांकरिता)—

(एक) भूविकासामार्फत तसेच खोदविहिरी, शेत तळी व इतर जलसंचयाच्या संरचनांसह सिंचनाकरिता योग्य त्या पायाभूत सुविधा उभारून परिच्छेद ४ मध्ये विनिर्दिष्ट कुटुंबांच्या जमिनींची उत्पादकता वाढवणे ;

(दोन) फलोत्पादन, रेशीम उत्पादन, रोपमळा व प्रक्षेत्र वनीकरण यांमार्फत उपजीविकेची साधने वाढवणे ;

(तीन) परिच्छेद ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कुटुंबांच्या पडीक अथवा उजाड जमिनी लागवडीखाली आणण्याकरिता त्या जमिनींचा विकास करणे ;

(चार) इंदिरा आवास योजनेअंतर्गत किंवा राज्य वा केंद्र शासनाच्या अशा अन्य योजनेअंतर्गत मंजूर केलेल्या घरांच्या बांधकामामधील अकुशल वेतन घटक ;

(पाच) पशुधनाला चालना देण्याकरिता कुक्कुटपालन संरचना, शेळीपालन संरचना, वराहपालन संरचना, गुरांचा गोठा, गुरांना चारा देण्यासाठी गव्हाणी व पाणी देण्यासाठी हाळ यांसारख्या पायाभूत सुविधा निर्माण करणे ; आणि

(सहा) मत्स्यव्यवसायाला चालना देण्याकरिता मासे सुकविण्यासाठी ओटे, साठवण सुविधा यांसारख्या तसेच सार्वजनिक जमिनीवरील हंगामी जलाशयांमधील मत्स्यशेतीला चालना देण्याकरिता पायाभूत सुविधा निर्माण करणे.

तीन. प्रवर्ग-क : राष्ट्रीय ग्रामीण उपजिविका अभियान अंतर्गत स्वयंसहाय्यता गटांकरिता सामाईक पायाभूत सुविधा—

(एक) जैविक खतांकरिता आवश्यक असणाऱ्या शाश्वत पायाभूत सुविधा उभारून आणि कृषी उत्पादनांसाठी पक्क्या स्वरूपाच्या साठवण सुविधांसह हंगामोत्तर सुविधा उभारून कृषी उत्पादकतेस चालना देण्याबाबतची कामे ; आणि

(दोन) स्वयं-सहाय्यता गटांच्या उपजीविकेच्या उपक्रमांकरिता सामाईक कार्यकक्ष.

चार. प्रवर्ग-ड : ग्रामीण पायाभूत सुविधा—

(एक) 'हगणदारीमुक्त' गावाचा दर्जा संपादन करण्याच्या उद्देशाने एकतर स्वतंत्रपणे किंवा शासकीय विभागाच्या इतर योजनांच्या अभिसरणातून व्यक्तिगत घरगुती शौचालये, शाळेतील प्रसाधन गृहे, अंगणवाडी—प्रसाधनगृहे आणि विहित मानकांनुसार घनकचरा व

सांडपाणी व्यवस्थापन यांसारखी ग्रामीण स्वच्छतेसंबंधातील कामे ;

(दोन) रस्त्यांनी न जोडलेल्या गावांना बारमाही ग्रामीण रस्त्यांनी जोडणे आणि निश्चित करण्यात आलेली ग्रामीण उत्पादन केंद्रे विद्यमान पक्क्या रस्त्याच्या जाळ्याशी जोडणे ; आणि गावामधील पार्श्व नाली व मोऱ्या यांसह अंतर्गत पक्के रस्ते अथवा मार्ग बांधणे ;

(तीन) खेळाची मैदाने उभारणे ;

(चार) ग्राम व गट स्तरावर पूर नियंत्रण व संरक्षण कामांसह आपत्कालीन सिद्धता ठेवणे अथवा रस्ते पूर्ववत करणे अथवा इतर आवश्यक सार्वजनिक पायाभूत सुविधांचे पुनःस्थापन करणे, सखल भागात जलनिःस्सारण व्यवस्थेची तरतूद करणे, पुराचे पाणी वाहून नेणारे प्रवाह मार्ग खोल करणे व त्यांची डागडुजी करणे, प्रवनिकेचे नूतनीकरण करणे, तटीय क्षेत्राच्या संरक्षणासाठी नाल्याचे (स्टॉर्म वॉटर ड्रेन) बांधकाम करणे ;

(पाच) ग्राम व गट स्तरावर ग्राम पंचायती, महिला स्वयं-सहाय्यता गट, संघ, चक्रीवादळ छावणी, अंगणवाडी केंद्रे, गाव बाजार व स्मशानभूमी इत्यादींकरिता इमारती बांधणे ;

(सहा) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ (२०१३ चा २०) याच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता अन्नधान्य साठवण इमारती बांधणे ;

(सात) अधिनियमांतर्गत करावयाच्या बांधकामाचा अंदाजाचा भाग म्हणून त्याकरिता लागणाऱ्या बांधकाम साहित्याची निर्मिती करणे ;

(आठ) अधिनियमांतर्गत निर्माण केलेल्या ग्रामीण सार्वजनिक मत्तांचे परीरक्षण करणे ;

(नऊ) राज्य शासन या संदर्भात अधिसूचित करील अशी इतर कोणतीही कामे ; आणि

(दहा) केंद्र सरकार राज्य शासनाशी विचारविनिमय करून अधिसूचित करेल असे अन्य कोणतेही काम.

(२) प्रत्येक ग्रामपंचायत, स्थानिक क्षेत्राची क्षमता, स्थानिक गरजा व साधनसंपत्ती विचारात घेऊन व परिच्छेद ८ च्या तरतुदींनुसार, ग्राम सभेच्या सभांमध्ये प्रत्येक कामाचा प्राथम्यक्रम निर्धारित करील.

(३) गवत कापणे, खडीकरण करणे, शेतीची कामे यांसारखी अमूर्त स्वरूपाची, मोजता न येण्याजोगी व वारंवार उद्‌भवणारी कामे हाती घेण्यात येणार नाहीत.

**४.** वैयक्तिक लाभाची कामे देताना पुढील प्रवर्गातील कुटुंबाच्या मत्तांबाबत कामांना प्राधान्य देण्यात येईल,—

(अ) अनुसूचित जाती ;

(ब) अनुसूचित जमाती ;

(क) भटक्या जमाती ;

(ड) निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) ;

(इ) दारिद्र्यरेषेखालील इतर कुटुंबे ;

(फ) स्त्री-कर्ता असलेली कुटुंबे ;

(ग) शारीरिकदृष्ट्या विकलांग व्यक्ती कर्ता असलेली कुटुंबे ;

(ह) जमीन सुधारणांचे लाभार्थी ;

(आय) इंदिरा आवास योजनेखालील लाभार्थी ;

(जे) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वनवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ (२००७ चा २) खालील लाभार्थी, आणि

उपरोक्त प्रवर्गांमधील पात्र लाभार्थींना प्राधान्य देण्यात आल्यानंतर, कृषि कर्जमाफी व कर्ज सहाय्य योजना, २००८ यामध्ये व्याख्या केलेल्या लहान व सीमांतभूधारक शेतकऱ्यांच्या जमिनीवरील कामांना, शर्तींच्या अधीनतेने प्राधान्य देण्यात येईल आणि अशा कुटुंबांच्या जमिनी अथवा घरवाडीसंबंधी हाती घेण्यात येणाऱ्या प्रकल्पावरील काम करण्यास तयार असलेल्या किमान एका सदस्याकडे जॉबकार्ड असणे आवश्यक असेल.

**५.** परिणामकारक आंतरविभागीय अभिसरण साध्य करण्यासाठी राज्य शासन ठोस पावले उचलेल. जेणेकरून, योजनेच्या कामांचा दर्जा व उत्पादकता वाढेल, जेणेकरून या योजनेच्या अंमलबजावणीच्या अंतिम टप्प्यापर्यंत मत्तांचा दर्जा व उत्पादकता यात सुधारणा होऊन दारिद्र्य निर्मूलनास मदत होईल.

**६.** राज्य शासनाने निर्धारित केलेल्या सविस्तर कार्यपद्धतीनुसार, प्रत्येक वर्षाच्या ऑगस्ट ते डिसेंबर महिन्यादरम्यान पंचायत राजच्या प्रत्येक स्तरावर सुनियोजित सहभागी नियोजन प्रक्रियेचा अवलंब करण्यात येईल. ग्रामपंचायतीमार्फत कार्यान्वित होणारी सर्व कामे निश्चित करताना ती ग्रामसभेसमोर ठेवण्यात येतील आणि पंचायत समितीकडून किंवा इतर अंमलबजावणी अभिकरणाकडून पार पाडण्याची कामे अपेक्षित फलनिष्पत्तीनुसार पंचायत समितीसमोर किंवा जिल्हा परिषदेसमोर ठेवण्यात येतील. जिल्ह्यातील शेतीच्या नेहमीच्या कामावर प्रतिकूल परिणाम होणार नाही आणि एका बाजूने किमान वेतनावर हमीचे काम देण्याचे तत्त्व व दुसऱ्या बाजूने शेतीच्या कामासाठी असणाऱ्या मजूरविषयक गरजा, त्याचप्रमाणे राज्य शासनाची नेहमीची योजनांतर्गत व योजनेतर अशी जी कामे असतात त्यांच्या अंमलबजावणीसाठी असणाऱ्या मजूरविषयक गरजा यांमध्ये ज्यामुळे समतोल राखला जाईल अशा रीतीने या योजनेखाली हाती घेण्यात येणाऱ्या कामांचे आयोजन करण्यात येईल.

**७.** कोणत्याही जॉब कार्डधारकाला गरजेनुसार कामाची मागणी लेखी वा तोंडी स्वरूपात किंवा प्रत्येक प्रभाग व ग्रामपंचायतीमध्ये महिन्यातून एकदा आयोजित होणाऱ्या रोजगार दिवशी करता येईल आणि त्यांनी केलेल्या कामाच्या मागणीनुसार कामाची तरतूद करावी लागेल.

**८.** (१) अपेक्षित कामाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने कामाचे पुरेसे शेल्फ ठेवताना किमान एक मजूर प्रदान काम ठेवावे, ज्यामध्ये विशेषतः दुर्बल कुटुंबांना खास करून वयोवृद्ध व विकलांगांसाठी एक काम राखीव असेल. जेणेकरून, कोणत्याही वेळी कामाच्या मागणीनुसार काम देता येईल.

(२) उक्त कामांचा तपशील गावात भित्तीफलकावर लिहून ठळकपणे प्रदर्शित करण्यात येईल.

**९.** सार्वजनिक स्वरूपाची कामे सुरू करताना, चालू किंवा अपूर्ण कामे प्रथमतः पूर्ण केली जातील याची खात्री करण्यात येईल.

**१०.** कामाची मागणी नोंदविल्याचा दिनांक किंवा आगाऊ अर्ज केला असेल त्याबाबतीत ज्या दिनांकास कामाची मागणी असेल तो दिनांक, यापैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत काम पुरविण्यात येईल.

**११.** (१) विनिर्दिष्ट कालमर्यादेत मागणीनुसार काम पुरविता येऊ शकले नसेल त्या बाबतीत, संगणक प्रणालीद्वारे किंवा व्यवस्थापन माहिती प्रणालीद्वारे स्वयंचलितरित्या परिगणना केल्याप्रमाणे आणि अधिनियमाअन्वये तरतूद केल्याप्रमाणे बेरोजगार भत्ता देण्यात येईल. कार्यक्रम अधिकारी नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तवच फक्त बेरोजगार भत्ता नाकारू शकेल.

(२) जेथे बेरोजगार भत्ता देण्यात आला असेल किंवा तो प्रदेय झाला असेल त्याबाबतीत, कार्यक्रम अधिकारी, अर्जदाराला रोजगार न पुरविण्याची लेखी कारणे संबंधित जिल्हा कार्यक्रम समन्वयकाला कळवील.

(३) जिल्हा कार्यक्रम समन्वयक, बेरोजगार भत्ता दिल्याचे अंतर्भूत असलेल्या प्रकरणांमध्ये रोजगार का पुरविता आला नाही याचे स्पष्टीकरण आपल्या वार्षिक अहवालातून राज्य परिषदेला देईल.

**१२.** या योजनेखालील प्रत्येक कामाचे, राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या प्राधिकरणाने यथोचितरित्या मंजूर केलेले एक तांत्रिक अंदाजपत्रक असेल ; त्या अंदाजपत्रकांना मंजुरी देताना, पुढील बाबी विचारात घेतल्या जातील :—

(अ) बांधकामाचा समावेश असलेल्या सर्व कामासाठी मितव्ययी, मजूर आधारित तंत्रज्ञान आणि स्थानिक उपलब्ध साधन सामग्रीचा वापर यांचा शक्यतोवर उपयोग करून घेण्यात येईल ;

(ब) सर्व हितसंबंधित घटकांना सहज समजण्यासाठी परिमाणांचे (अंदाज पत्रकामध्ये वापरलेले) देयक सामान्य परिभाषेमध्ये नमूद केलेले असेल ;

(क) प्रत्येक कामाचे संकल्पचित्र, अंदाज पत्रक व एक तांत्रिक टिप्पणी असावी, जेणेकरून कामामधून अपेक्षित फलनिष्पत्ती स्पष्ट होईल.

**१३.** ग्रामपंचायत स्तरावर अंतिम रूप दिलेल्या आणि गट किंवा जिल्हास्तरावर एकत्रित केलेल्या कामांना, कोणत्याही ग्रामपंचायतीतील कामांची सूची किंवा कामे ही, त्या ग्रामपंचायतीसाठी मंजुरी दिलेल्या मनुष्यबळ अंदाजपत्रकाच्या (लेबर बजेटच्या) दुप्पटीपेक्षा कमी नाहीत याची सुनिश्चिती केल्यानंतरच फक्त ग्रामपंचायत स्तरावरील कामांना अंतिम रूप दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत सक्षम प्राधिकाऱ्याकडून गटनिहाय प्रशासकीय किंवा वित्तीय मंजुरी देण्यात येईल.

**१४.** या योजनेअंतर्गत हाती घेतलेल्या कामांसाठीचे हजेरीपट पुढीलप्रमाणे ठेवण्यात येतील :—

(अ) प्रत्येक हजेरीपट हा इंग्रजी किंवा स्थानिक लोकभाषेत असेल आणि त्यास कामासाठी अर्ज केलेल्या मजुरांच्या सूचीसह संगणक प्रणालीद्वारे (इ-मस्टर) इलेक्ट्रॉनिकरित्या तयार

केलेला एक विशेष ओळख क्रमांक दिलेला असेल. प्रत्येक हजेरीपटावर ग्रामपंचायतीची प्राधिकृत व्यक्ती किंवा कार्यक्रम अधिकारी स्वाक्षरी करील ; आणि त्यात केंद्र सरकारकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अनिवार्य माहितीचा समावेश असेल ;

(ब) योजनेअंतर्गत प्राधिकृत केलेल्या व्यक्तींद्वारे हजेरीपटांवर दैनिक हजेरी चिन्हांकित करून ते कामाच्या ठिकाणी ठेवण्यात येतील, त्याचा तपशील, संगणक प्रणाली वापरून दैनिक तत्त्वावर लोकांना पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येईल ;

(क) योजनेत विहित केलेल्या रितीने अधिकाऱ्यांकडून नियतकालाने हजेरीपट तपासण्यात येईल ;

(ड) विहित कालावधीच्या अंतिम दिनी हजेरीपट बंद करण्यात येईल व त्यावर काम केलेल्या मजुराची प्रतिस्वाक्षरी घेण्यात येऊन तो, मोजणी करण्याकरिता तांत्रिक कर्मचारी वर्गाकडे सूपूर्द करण्यात येईल ;

(इ) हजेरीपटाचा तपशिलवार अभिलेख, वेळोवेळी विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे नोंदणी वहीत ठेवण्यात येईल ;

(फ) जेव्हा काम चालू असेल तेव्हा, ते काम करीत असलेले मजूर, एका आठवड्यातून किमान एकदा आपल्या कामाच्या ठिकाणाची सर्व देयके किंवा प्रमाणके याची पडताळणी करण्यासाठी व ती प्रमाणित करण्यासाठी साप्ताहिक आळीपाळीने आपल्यामधून पाचपेक्षा कमी नसतील इतक्या मजुरांची निवड करतील ;

(ग) कोणत्याही व्यक्तीस, सर्व दिवशी सर्व कामाच्यावेळी मागणी केल्यास, कामाच्या ठिकाणी असणारे हजेरीपट पाहता येतील.

**१५.** हजेरीपट बंद केल्यापासून तीन दिवसांच्या आत प्राधिकृत कर्मचारीवर्गाने कामाच्या ठिकाणी घेतलेल्या मोजमापांच्या आधारे फक्त वेतनाच्या रकमेचे प्रदान करण्यात येईल. विनिर्दिष्ट कालावधीत हे काम पूर्ण करण्यासाठी पुरेसा तांत्रिक कर्मचारीवर्ग नियुक्त केला आहे याची राज्य शासन सुनिश्चिती करील. मजुरांच्या कुटुंबातील योग्य त्या व्यक्तींना प्रशिक्षित किंवा कुशल करता येईल आणि समुचित तांत्रिक अधिकार सोपवून त्यांना कार्यदर्शी सहायक म्हणून नियुक्त करता येईल आणि कुशल मजुरांप्रमाणे त्यांना मजुरी देता येईल.

**१६.** राज्य शासन, स्त्री-पुरुष असा कोणताही भेद न करता, केलेल्या कामाचा दर्जा व परिमाणानुसार समान वेतन देईल आणि कामाचे विविध प्रकार व विविध हंगाम आणि नियतकालिक सुधारणा यांचा काळ, काम व वेगविषयक अभ्यास केल्यानंतर निश्चित केलेल्या ग्रामीण भागासाठी वेतन दरांच्या अनुसूचिनुसार वेतन प्रदान करण्यात येईल.

**१७.** महिला, वयोवृद्ध, विकलांग व्यक्ती आणि आजारपणामुळे अशक्त बनलेल्या व्यक्ती यांचा उत्पादक कामांमधील सहभाग वाढविण्यासाठी त्यांच्याकरिता, स्वतंत्र दरपत्रकाची तरतूद करण्यात येईल.

**१८.** (अ) विविध अकुशल मजुरांसाठीच्या वेतन दरांची अनुसूची निश्चित करण्यात येईल जेणेकरून विश्रांतीच्या एका तासासह आठ तास काम केलेली प्रौढ व्यक्ती, विनिर्दिष्ट दराऐवढे वेतन प्राप्त करू शकेल ;

(ब) प्रौढ मजुराचे कामाचे तास हे अनिश्चित असतील परंतु ते कोणत्याही दिवशी बारा तासांहून अधिक नसतील.

**१९.** ग्रामपंचायतींकडून हाती घेण्यात आलेल्या सर्व कामांकरिता, ग्रामपंचायत स्तरावरील कुशल व अर्ध-कुशल मजुरांच्या वेतनाचा तसेच महत्त्वाच्या घटकांवरील खर्च हा, चाळीस टक्क्यांहून अधिक असणार नाही. ग्रामपंचायतींव्यतिरिक्त इतर अंमलबजावणी यंत्रणांकडून हाती घेण्यात आलेल्या कामांकरिता गट, किंवा मधल्या स्तरावरील कुशल व अर्ध-कुशल मजुरांच्या वेतनासह महत्त्वाच्या सामग्रीवरील एकूण खर्च हा, गट स्तरावर किंवा मध्यम स्तरावर चाळीस टक्क्यांहून अधिक असणार नाही.

**२०.** योजनेअंतर्गत पार पाडावयाची कामे ही, कोणताही कंत्राटदार न नेमता करण्यात येतील. योजनेखालील अंमलबजावणी अभिकरणे ही, अधिनियमाअन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यवाहीस अनुरूप आणि स्वेच्छा माहितीचे प्रकटीकरण व सामाजिक अंकेक्षण यांचे अनुपालन केल्यानंतर कामे पार पाडतील.

**२१.** व्यवहार्य असेल तेथवर, कार्यक्रम अंमलबजावणी अभिकरणांकडून केली जाणारी कामे ही, शारीरिक श्रमाचा वापर करून पार पाडता येतील आणि मजुरांऐवजी कोणत्याही यंत्रांचा वापर केला जाणार नाही.

**२२.** ग्रामपंचायती किंवा अंमलबजावणी अभिकरण कामांसाठी लागणारे सर्व साहित्य, राज्य शासनाने विर्निर्दिष्ट केल्याप्रमाणे पारदर्शी निविदा प्रक्रियेचा वापर करून त्याद्वारे प्राप्त करील.

**२३.** योजनेअंतर्गत परवानगी दिलेल्या प्रशासकीय खर्चापैकी किमान एक-तृतियांश इतका खर्च, ग्रामपंचायत स्तरावरील ग्राम रोजगार सेवक, इतर तांत्रिक कर्मचारीवर्ग नेमण्यासाठी आणि त्यांनी केलेल्या कामानुसार मानधन देण्यासाठी आणि इतर प्रशासकीय खर्चासाठी करण्यात येईल.

**२४.** अंमलबजावणीच्या सर्व स्तरांवरील पारदर्शकता व जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी पुरेशा तरतुदींचा समावेश असणाऱ्या प्रत्येक योजनेत पुढील उपाययोजनांचा अंतर्भाव असेल :—

(अ) अनिवार्य स्वेच्छा माहिती प्रकटीकरणाद्वारे मूलभूत माहिती सर्वसामान्यांना व लाभधारकांना मिळण्यासाठी जनता सूचना तंत्राचा अवलंब करून त्यात खालील बाबींचा समावेश असेल :-

(१) स्थानिक परिभाषेत कामाचा तपशील, अंदाजित श्रम दिवस, वापरावयाच्या साहित्यांचे परिमाण आणि बाब-निहाय अंदाजित खर्च दर्शविणारे कामाचे अंदाजपत्रक प्रत्येक कामाच्या ठिकाणी जनतेसाठी प्रदर्शित करणे.

(२) जॉब कार्डांची सूची, प्रत्येक जॉब कार्डधारकाला पुरविलेल्या कामाच्या दिवसांची संख्या आणि दिलेले वेतन आणि अधिनियमाअन्वये तरतूद केलेले हक्क हे, गावातील भितींवर किंवा सार्वजनिक सूचना फलकांवर ठळकपणे प्रदर्शित करणे.

(३) मान्यताप्राप्त प्रकल्पांची सूची, ग्रामपंचायतींनी व क्षेत्रीय विभागांनी हाती घेतलेली किंवा पूर्ण केलेली वर्षनिहाय कामे, पुरविलेला रोजगार, प्राप्त झालेला निधी व खर्च, प्रत्येक कामात वापरलेली परिमाणासह साहित्याची सूची, ज्या दरास साहित्य प्राप्त केले होते तो दर ग्रामपंचायत कार्यालयातील सूचना फलकाद्वारे प्रदर्शित करणे.

(४) संकेतस्थळावर माहिती प्रदर्शित करणे :— नियोजन विभागाचा रोजगार हमी योजना उप विभाग हा, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) याच्या कलम ४ (१) (ख) च्या सर्व सतरा तरतुदींची पूर्णपणे पूर्तता करण्यासाठी आपली संकेतस्थळे अद्ययावत केली आहेत आणि अधिनियमाविषयीची सर्व माहिती इलेक्ट्रॉनिक स्वरुपात मोफत डाऊनलोड करण्यासाठी जनतेकरिता उपलब्ध करून दिली आहे याची सुनिश्चिती करील.

(ब) प्रत्येक महिन्यात सर्व कामांचे समवर्ती सामाजिक अंकेक्षण करण्यात येईल. या प्रयोजनार्थ, कार्यक्रम अधिकारी, मागील एका महिन्यात केलेल्या कामांचा आणि केलेल्या खर्चाचा तपशील, भारत निर्माण स्वयंसेवक, ग्रामीण सामाजिक अंकेक्षक, स्वयं-सहायता गट, युवक संघटना आणि यांसारख्या इतर ग्रामस्तरावरील संघटना यांना पडताळणीसाठी आणि विचलने (चढउतार) कोणतेही असल्यास त्याबाबतचा अहवाल देण्यासाठी निःशुल्क उपलब्ध करून देईल.

(क) सामाजिक अंकेक्षण :— योजनेंतर्गत हमी दिलेल्या ग्रामीण रोजगाराच्या सर्व शर्तींची आणि अधिनियमाखालील सर्व खर्चासह मजुरांच्या किमान हक्कांच्या तरतुदींची अंमलबजावणी ही प्रत्येक सहा महिन्यांतून किमान एकदा केंद्र सरकारने विहित केलेल्या रितीने सामाजिक अंकेक्षणाद्वारे करण्यात येईल व त्यात खालील बाबींचा समावेश असेल :—

(एक) सामाजिक अंकेक्षक म्हणून स्थानिक तरूणांची निवड करणे, त्यांना प्रशिक्षण देणे ; सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीकरिता त्या ग्रामपंचायतीबाहेरील तरूणांसह प्रशिक्षित सामाजिक अंकेक्षक गटांची स्थापना करणे, परंतु, गावाच्या सामाजिक अंकेक्षकांच्या किमान २५ टक्के इतके अंकेक्षक हे अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या गटातील असतील. अशा तरुणांनी दिलेल्या सेवांबद्दल, त्यांच्यापैकी प्रत्येकास, केंद्रीय अधिनियमाखाली कुशल मजुराला देय असलेल्या पारिश्रमिकाच्या दरापेक्षा कमी नाही अशा दराने पारिश्रमिक देण्यात येईल.

(दोन) सामाजिक अंकेक्षक गटांना विनाशुल्क अभिलेख (हजेरीपट, मोजमाप नोंदवह्या, प्रदान आदेश) मोफत पुरविणे.

(तीन) कामाची उत्पादकता व उपयुक्तता निश्चित करण्याकरिता मोजमाप नोंदवह्यांमधील मोजमापाची पडताळणी करण्यासाठी प्रत्येक कामाच्या जागेची तपासणी करणे.

(चार) संबंधित लाभार्थींकडील अभिलेखावरून प्रत्येक संवितरित रकमेची पडताळणी करणे.

(पाच) अंदाजित फलनिष्पतीवरून फलनिष्पतीची पडताळणी करणे.

(सहा) क्षेत्रातील हक्कविषयक तरतुदींची पडताळणी करणे.

(सात) दुर्बल घटकांसाठी या अधिनियमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

(आठ) निष्कर्ष वाचून दाखविण्यासाठी प्रभाग, ग्रामपंचायत व गटस्तरांवर सामाजिक अंकेक्षकांकडून जाहीर सुनावणींचे आयोजन करणे.

(नऊ) सामाजिक अंकेक्षण अहवालांवरील कार्यवाहीचा पद्धतशीर पाठपुरावा करणे व अफरातफर झालेल्या रकमांची वसुली करणे, सामाजिक अंकेक्षण केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत सामाजिक अंकेक्षणांत निदर्शनास आलेल्या अनियमिततांवर योग्य ती शिस्तभंगाची वा दंडात्मक कार्यवाही करणे.

**२५.** अधिनियमान्वये खर्च केलेल्या कोणत्याही अफरातफरीच्या रकमा ह्या, राज्यात वसुलीसाठी प्रचलित असलेल्या महसुली कायद्यांन्वये वसुलीयोग्य असतील.

**२६.** कामाच्या योग्य त्या दर्जाची खात्री करण्यासाठी तसेच ते काम पूर्ण करण्यासाठी दिलेले एकूण वेतन हे केलेल्या कामाचा दर्जा व परिमाण यांनुसार आहे याची खात्री करण्यासाठी गुणवत्ता नियंत्रण पथकांकडून कामांची नियमित तपासणी व पर्यवेक्षण करण्यात येईल.

**२७.** राज्य शासन एकतर आपल्या स्वतःच्या यंत्रणेद्वारे किंवा नागरी सामाजिक संघटना, औपचारिक गटाचे कामगार किंवा कामगार प्रतिनिधी यांना सहभागी करून घेऊन अंमलबजावणीमधील त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी आणि अधिनियमान्वये दिलेल्या हक्कांच्या तरतुदींची सुनिश्चिती करण्यासाठी उपाययोजना करील.

**२८.** प्रभावी गाऱ्हाणी निवारण यंत्रणा स्थापन करणे, ज्यामध्ये खालील बाबींचा समावेश असेल,—

(अ) जेव्हा गाऱ्हाणी उद्‌भवतील तेव्हा ती गाऱ्हाणी स्वीकारण्यासाठी प्रत्येक आठवड्यातील एक दिवस निश्चित करून, प्रभाग, ग्रामपंचायत, गट व जिल्हा पातळीवर गाऱ्हाणी स्वीकारण्याकरिता त्या दिवशी सर्व कर्मचारी अनिवार्यपणे उपस्थित राहतील ;

(ब) तक्रारी घेण्यासाठी प्राधिकृत केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांकडून लेखी व तोंडी स्वरूपात आणि दूरध्वनी, इंटरनेटद्वारा स्वीकारलेल्या तक्रारींची दिनांक असलेली पावती देण्यात येईल ;

(क) मोका तपासणीद्वारे कामाची चौकशी करणे, निरीक्षण करणे व तक्रार निकालात काढणे ही कार्यवाही सात कार्यालयीन दिवसांमध्ये करण्यात येईल ;

(ड) चौकशीची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर, संबंधित प्राधिकाऱ्याकडून पंधरा दिवसांच्या आत तात्काळ कार्यवाही करण्यात येईल ;

(इ) सात दिवसांच्या आत तक्रार निकालात न काढल्यास ती बाब, अधिनियमाच्या कलम १४क अन्वये उल्लंघन समजले जाईल ;

(फ) प्रथम दर्शनी तक्रारीची व सामाजिक अंकेक्षण अहवालातील निष्कर्षांची प्राथमिक चौकशी केल्यानंतर आर्थिक अनियमिततांसंबंधी प्रथम दर्शनी पुरावा दिसून येईल, त्याबाबतीत, जिल्हा कार्यक्रम समन्वयक विधी सल्ला घेतल्यानंतर प्रथम माहिती अहवाल दाखल केला असल्याची खात्री करील ;

(ग) संबंधित प्राधिकारी, व्यथित झालेल्या व्यक्तीस किंवा पक्षकारास चौकशीच्या निष्कर्षांची आणि त्याच्या गाऱ्हाण्याचे निवारण करण्यासाठी हाती घेण्यात येत असलेल्या उपायांची माहिती लेखी स्वरूपात कळवण्यास जबाबदार असेल ;

(ह) सर्व अभिकरणांकडे आलेल्या तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीची माहिती अनुक्रमे पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या बैठकींसमोर मांडण्यात येईल ;

(आय) ग्रामपंचायतीच्या आदेशांवरील अपिले कार्यक्रम अधिकाऱ्यांकडे दाखल करण्यात येतील ; कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या आदेशांवरील अपिले जिल्हा कार्यक्रम समन्वयकाकडे करण्यात येतील ; आणि जिल्हा कार्यक्रम समन्वयकाच्या आदेशावरील अपिले ही राज्य आयुक्त (राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) आणि राज्य गाऱ्हाणे निवारण अधिकारी यांच्याकडे करण्यात येतील ;

(जे) सर्व अपीले आदेश दिल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत करण्यात येतील ;

(के) सर्व अपीले एका महिन्याच्या आत निकालात काढण्यात येतील ;

(एल) ग्रामपंचायत, गट, जिल्हा स्तरावर नोंदविलेल्या तक्रारींचे निवारण ती पंधरा दिवसांच्या आत न झाल्यास, त्या लगेच वरच्या स्तरावर हस्तांतरित होतील आणि त्या तक्रारींचे संनियंत्रण इलेक्ट्रॉनिकरित्या करण्यात येईल.

**२९.** तक्रारनिवारण अधिकारी (ओंबड्सपर्सन) :— प्रत्येक जिल्ह्यात मार्गदर्शक सूचना दिल्याप्रमाणे गाऱ्हाणी घेणे, त्यांची चौकशी करणे व निवाडा देणे यांसाठी एक तक्रार निवारण अधिकारी (ओंबड्सपर्सन) असेल.

**३०.** राज्य शासन, कार्यक्रम अधिकारी, जिल्हा कार्यक्रम समन्वयक, तक्रार निवारण अधिकारी (ओंबड्सपर्सन) सार्वजनिक अंकेक्षण पथके, संपर्क केंद्रे (कॉल सेंटर) किंवा सहाय्य केंद्र (हेल्प लाईन), दक्षता व संनियंत्रण समित्या, राष्ट्रीय स्तरावरील संनियंत्रक, रोजगार सहायता केंद्रे आणि कार्यक्रमाचे आणि गाऱ्हाणी निवारणाचे प्रभावी संनियंत्रण करण्यासाठी समुचित शासनाने प्राधिकृत केलेली इतर कोणतीही संस्था यांच्या कामकाजाचे समन्वयन करील.

**३१.** ज्या ज्या वेळी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन होईल त्या त्या वेळी राज्य शासन किंवा जिल्हा कार्यक्रम समन्वयक किंवा कार्यक्रम अधिकारी किंवा तक्रार निवारण अधिकारी किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेला इतर कोणताही प्राधिकारी यांच्याकडून यथायोग्य चौकशी केल्यानंतर त्याबाबतीत केंद्रीय अधिनियमाच्या कलम २५ च्या तरतुदीनुसार कार्यवाही केली जाईल.

**३२.** जिल्हा कार्यक्रम समन्वयक, कार्यक्रम अधिकारी व ग्रामपंचायत, त्याच्या किंवा तिच्या अधिकारीतेतील योजनेच्या अंमलबजावणी संबंधातील तथ्ये व आकडे आणि उद्दिष्टे यांचा अंतर्भाव असणारा एक वार्षिक अहवाल तयार करील आणि त्याची एक प्रत योजनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी फी प्रदान केल्यानंतर, लोकांच्या मागणीनुसार उपलब्ध करून देण्यात येईल.

**३३.** योजनेशी संबंधित सर्व दस्तऐवज व लेखे जनतेला छाननीकरिता मोफत उपलब्ध असतील. कोणत्याही इच्छुक व्यक्तीने योजनेशी संबंधीत माहितीच्या प्रती किंवा त्यातील संबंधित उतारे यांची मागणी केल्यास त्यासंदर्भातील मूल्य भरल्यानंतर त्याच्या अर्जाच्या दिनांकापासून तीन कामकाजाच्या दिवसांच्या आत ते उपलब्ध करून देण्यात येतील.

**३४.** क्षमता विकास योजना, माहिती शिक्षण दळणवळण योजना व पंचायतींच्या बळकटीकरणाची योजना त्या योजनेचा एक भाग म्हणून असेल.

## अनुसूची तीन

[(कलम ३-ब (१) व (२) पहा)]

योजनेखाली हमी दिलेल्या ग्रामीण रोजगारासाठी शर्ती व कामगारांचे किमान हक्क

जॉब कार्ड :—

**१.** कोणत्याही ग्रामीण क्षेत्रात राहणाऱ्या आणि अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यास तयार असणाऱ्या प्रत्येक कुटुंबातील प्रौढ व्यक्तीस, जॉब कार्ड मिळविण्याकरिता आपल्या कुटुंबाची नोंदणी करण्यासाठी, ते ज्या गावात राहत असतील ते गाव ज्या ग्रामपंचायतीच्या अधिकारक्षेत्रात येत असेल त्या ग्रामपंचायतीकडे आपले नाव, वय व निवासाचा पत्ता याबाबतची माहिती सादर करता येईल. जर कामाची मागणी करणारी व्यक्ती ही, एखादी महिला किंवा विकलांग व्यक्ती किंवा वयोवृद्ध व्यक्ती किंवा बंधमुक्त मजूर किंवा विशेषतः दुर्बल आदिवासी गटातील असेल तर, त्यांना एका व्यवच्छेदक रंगाचे विशेष जॉब कार्ड देण्यात यावे, जेणेकरून त्यांना काम देताना यथास्थिति कामाचे मूल्यमापन आणि कामाच्या ठिकाणी सोयीसुविधांच्या बाबतीत विशेष संरक्षण मिळण्याची सुनिश्चिती होईल.

**२.** ग्रामपंचायतीला, तिला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, असा अर्ज मिळण्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, कुटुंबातील प्रौढ व्यक्तींच्या नोंदणीचा तपशील, त्यांचे छायाचित्र, बँकेतील किंवा टपाल कार्यालयातील खाते क्रमांक, विमापत्र व आधार क्रमांक असल्यास त्यासह, एक विशिष्ट जॉब कार्ड क्रमांक असलेले एक जॉब कार्ड देणे हे, ग्रामपंचायतीचे कर्तव्य असेल.

**३.** देण्यात आलेले जॉब कार्ड किमान पाच वर्षांकरिता वैध असेल त्यानंतर, यथोचित पडताळणीनंतर त्याचे नुतनीकरण करता येईल. एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या वयाचे खोटे प्रमाणपत्र देऊन स्वतःची नोंदणी करून घेतली आहे, याबाबत नोंदणी करणाऱ्या प्राधिकरणाची खात्री झाल्यास त्यास, संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर तिचे नाव नोंदवहीतून काढून टाकता येईल.

**४.** कोणतेही जॉब कार्ड ते दुबार असल्याचे आढळून आल्याखेरीज किंवा जर ते संपूर्ण कुटुंब कायमस्वरूपी त्या ग्रामपंचायती बाहेरच्या ठिकाणी स्थलांतरित झाले असेल व अशा गावात दीर्घकाळ राहत नसल्याचे आढळून आल्याखेरीज, रद्द करण्यात येणार नाही.

**५.** या अधिनियमाखालील मुख्य हक्क नमूद करतेवेळी, राज्य शासन, जॉब कार्डमधील, पुढील तपशील नियमितपणे अद्ययावत करून घेण्याची व्यवस्था करील :—

(एक) जितक्या दिवसांच्या कामाची मागणी केली असेल त्या दिवसांची संख्या ;

(दोन) नेमून दिलेल्या कामाच्या दिवसांची संख्या ;

(तीन) हजेरीपटावरील क्रमांकासह नेमून दिलेल्या कामांचे वर्णन ;

(चार) मोजमापांचा तपशील ;

(पाच) बेरोजगार भत्ता दिला असल्यास ;

(सहा) केलेल्या कामाच्या दिवसांचे दिनांक व संख्या ;

(सात) दिनांक-निहाय देण्यात आलेल्या वेतनाची रक्कम ;

(आठ) विलंबाबद्दल दिलेली भरपाई, कोणतीही असल्यास.

(शा.म.मु.)एच ४०२२–६ (६,५६०–८-२०१४)

कामाची मागणी :—

**६.** नोंदणीकृत कुटुंबातील ज्या प्रौढ व्यक्तीचे नाव जॉब कार्डावर असेल अशी प्रत्येक व्यक्ती, योजनेंतर्गत अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी अर्ज करण्यास हक्कदार असेल ; आणि अशा प्रत्येक अर्जाची नोंदणी करणे आणि दिनांकित पावती देणे अनिवार्य करण्यात येईल व अशी नोंद संगणक प्रणालीद्वारे करण्यात येईल.

**७.** राज्य, दुर्बल गटांच्या आवश्यकतांची कृतीशीलपणे पडताळणी करील आणि त्यांना काम देईल.

**८.** कामासाठीचा अर्ज, प्रभाग सदस्याकडे किंवा ग्रामपंचायतीकडे किंवा कार्यक्रम अधिकाऱ्याकडे किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे किंवा दूरध्वनीवरून किंवा भ्रमणध्वनीवरून किंवा परस्पर संवाद प्रतिसाद यंत्रणेमार्फत किंवा एखाद्या संसाधन केंद्रामार्फत किंवा संकेतस्थळावरून किंवा या प्रयोजनार्थ उभारण्यात आलेल्या एखाद्या सार्वजनिक केंद्रावरून किंवा राज्य शासनाने अधिकृत केलेल्या इतर कोणत्याही साधनामार्फत मौखिक किंवा लेखी स्वरूपात करता येऊ शकेल.

**९.** कामासाठीचा अर्ज व्यक्तिशः किंवा सामूहिकरित्या भरता येऊ शकेल.

**१०.** कुटुंबाच्या सामाईक हक्कास अधीन राहून एखाद्या व्यक्तीस जितक्या दिवसाच्या रोजगारासाठी अर्ज  करता येईल अशा रोजगाराच्या दिवसांच्या संख्येवर किंवा तिला प्रत्यक्षात पुरविलेल्या रोजगाराच्या दिवसांच्या संख्येवर कोणतीही मर्यादा असणार नाही.

**११.** सामान्यतः, कामाच्या मागणीचा अर्ज किमान सलग चौदा दिवसांच्या कामासाठी असला पाहिजे, तथापि, स्वच्छता सुविधेशी संबंधित कामासाठीचा अर्ज किमान सहा सलग दिवसांच्या कामासाठी असला पाहिजे.

**१२.** योजनेमध्ये आगाऊ अर्ज करण्याची तरतूद करण्यात येईल म्हणजे ज्या दिनांकापासून रोजगाराची मागणी करण्यात आली असेल त्या दिनांकाच्या अगोदर अर्ज सादर करता येईल.

**१३.** योजनेमध्ये एकाच व्यक्तीस अनेक अर्ज सादर करण्याची तरतूद करण्यात येईल, परंतु ज्या कालावधीसाठी रोजगाराची मागणी करण्यात आली असेल तो कालावधी परस्पर व्याप्त असता कामा नये.

कामाचे वाटप :—

**१४.** ग्रामपंचायत आणि कार्यक्रम अधिकारी, प्रत्येक अर्जदाराला त्याचा अर्ज मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत किंवा आगाऊ अर्ज केला असेल त्याबाबतीत त्याने ज्या दिनांकापासून कामाची मागणी केली असेल त्या दिनांकापासून यापैकी जे नंतर घडेल तेव्हापासून, योजनेच्या तरतुदींनुसार अकुशल अंगमेहनतीचे काम पुरविण्यात येते याची खात्री करील. या योजनेखालील रोजगारासाठी स्वतः होऊन तयार असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कार्यक्रम अधिकारी, योजनेअन्वये अनुज्ञेय असलेले कोणत्याही प्रकारचे काम करण्यासाठी निदेश देऊ शकेल.

**१५.** अशी कामे देताना महिलांना अशाप्रकारे प्राधान्य देण्यात येईल की, लाभार्थींपैकी किमान एकतृतीयांश लाभार्थी ह्या, ज्यांनी कामासाठी नोंदणी व विनंती केली असेल अशा महिला असतील. एकाकी महिला व विकलांग व्यक्ती यांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

**१६.** ज्यांना काम देण्यात आले आहे अशा अर्जदारांना ही बाब जॉब कार्डमध्ये दिलेल्या पत्त्यावर पत्र पाठवून लेखी स्वरूपात किंवा ग्रामपंचायतींच्या कार्यालयात एक जाहीर सूचना प्रदर्शित करून कळविण्यात येईल.

**१७.** ज्यांना काम देण्यात आले आहे अशा व्यक्तींची यादी ग्रामपंचायतीच्या सूचना फलकावर किंवा कार्यक्रम अधिकाऱ्याच्या कार्यालयात आणि कार्यक्रम अधिकाऱ्यास आवश्यक वाटेल अशा अन्य ठिकाणी प्रदर्शित करण्यात येईल आणि राज्य शासनाला व कोणत्याही इच्छुक व्यक्तीला पाहण्यासाठी ती खुली असेल.

**१८.** शक्यतोवर, अर्ज करण्याच्या वेळी अर्जदार ज्या गावात राहत असेल त्या गावाच्या सभोवतालच्या पाच किलोमीटर अंतराच्या परिसरात त्याला रोजगार देण्यात येईल.

**१९.** या योजनेअंतर्गत, नवीन काम हे, अशा कामासाठी किमान दहा मजूर उपलब्ध असल्याशिवाय सुरू करता येणार नाही. तथापि, ही अट, राज्य शासनाने निर्धारित केल्याप्रमाणे, डोंगराळ क्षेत्रातील नवीन कामांसाठी व वृक्षारोपणाच्या कामांच्या बाबतीत लागू होणार नाही.

**२०.** परिच्छेद १८ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पाच किलोमीटर क्षेत्राच्या बाहेर रोजगार देण्यात आल्यास, त्याबाबतीत तो गटक्षेत्रांतर्गतच देण्यात येईल, व त्या मजुरांना होणारा जादा वाहतुकीचा खर्च व निर्वाहाचा अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी त्यांना वेतनाच्या दराच्या दहा टक्के इतके वेतन अतिरिक्त वेतन म्हणून देण्यात येईल.

**२१.** रोजगाराचा कालावधी हा किमान सलग चौदा दिवसांचा असेल आणि तो एका आठवड्यातील सहा दिवसांपेक्षा अधिक नसेल.

कामाच्या ठिकाणाचे व्यवस्थापन :—

**२२.** कामाच्या ठिकाणी पारदर्शकता असावी या प्रयोजनासाठी पुढील बाबींची सुनिश्चिती करण्यात येईल :—

(एक) प्रकल्पाच्या प्रारंभास एक बैठक घेण्यात येईल, त्यामध्ये कामाच्या विविध तरतुदींची माहिती, मजुरांना समजावून सांगण्यात येईल ;

(दोन) मंजूर कामाच्या आदेशाची एक प्रत, कामाच्या ठिकाणी सार्वजनिक निरीक्षणासाठी, उपलब्ध करून देण्यात येईल ;

(तीन) प्रत्येक कामाच्या मोजमापाचा अभिलेख आणि मजुरांचा सविस्तर तपशील सार्वजनिक निरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात येईल ;

(चार) या संदर्भात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने, नागरिकांच्या माहितीसाठी असणारा एक फलक, प्रत्येक कामाच्या ठिकाणी उभारण्यात येईल आणि तो नियमितपणे अद्ययावत करण्यात येईल ;

(पाच) केंद्र सरकारच्या अनुदेशानुसार स्थापन करण्यात आलेली दक्षता व संनियंत्रण समिती, सर्व कामांची तपासणी करील आणि तिच्या मूल्यमापनाचा अहवाल, केंद्र सरकारकडून विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यामधील कामाच्या नोंदवहीत अभिलिखीत करील आणि तो, सामाजिक अंकेक्षणादरम्यान ग्रामसभेला सादर करील.

**२३.** कामाच्या ठिकाणी, सुरक्षित पिण्याचे पाणी, मुलांसाठी विश्रांतीसाठी छपऱ्या व तसेच वेळ व काम पार पाडताना लहान-सहान जखमांवर आणि कामामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या इतर समस्यांवर तातडीने उपचार करण्यासाठी पुरेशा साहित्यासह असलेली प्रथमोपचार पेटी या सुविधा पुरविण्यात येतील.

**२४.** कोणत्याही कामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या महिलांसोबत पाच वर्षांपेक्षा कमी वय असणारी पाच किंवा त्यापेक्षा अधिक मुले असतील त्याबाबतीत, अशा महिला कामगारांपैकी एका महिलेला अशा मुलांवर लक्ष ठेवण्यासाठी प्रतिनियुक्त करण्याची तरतूद करण्यात येईल. अशाप्रकारे प्रतिनियुक्त केलेल्या व्यक्तीला वेतन दराप्रमाणे वेतन देण्यात येईल. त्या परिसरातील अत्यंत अल्प उत्पन्न असणाऱ्या महिला, शोषित महिला किंवा बंधबिगार किंवा दुबळ्या असल्यामुळे अपव्यापार होत असेल अशा किंवा मुक्त अंगमेहनतीचे काम करणाऱ्या मेहतर, यांना मुलांची काळजी घेण्याचे काम देण्याकरिता नियुक्त करण्यात यावे.

कल्याण :—

**२५.** या योजनेखाली रोजगारावर लावलेल्या कोणत्याही व्यक्तीला तिच्या रोजगारामुळे आणि तो रोजगारावर असताना झालेल्या अपघातामुळे कोणतीही वैयक्तिक इजा पोहोचली असेल तर, ती व्यक्ती, आवश्यक असतील असे वैद्यकीय उपचार, विनामूल्य करून घेण्यास हक्कदार असेल.

**२६.** इजा झालेल्या व्यक्तीस रुग्णालयात दाखल करणे आवश्यक असेल तेव्हा, राज्य शासन, निवास व्यवस्था, उपचार, औषधे व तिच्या वेतन दराच्या निम्म्या दरापेक्षा कमी नसेल इतका दैनिक भत्ता यांचे प्रदान करणे, यांसह, त्या व्यक्तीला रुग्णालयामध्ये दाखल करण्याची व्यवस्था करील.

**२७.** (एक) या योजनेखाली रोजगारावर लावलेल्या कोणत्याही व्यक्तीला तिच्या रोजगारामुळे आणि ती रोजगारावर असताना झालेल्या अपघातामुळे कोणतीही वैयक्तिक इजा पोहोचली असेल तर ती व्यक्ती योजनेअनुसार अनुज्ञेय असतील असे वैद्यकीय उपचार विनामूल्य करुन घेण्यास हक्कदार असेल आणि जेव्हा अशा व्यक्तीस रूग्णालयात ठेवणे आवश्यक असेल तेव्हा, राज्य शासन निवास व्यवस्था, उपचार व आहार यांसह त्या व्यक्तीला, रुग्णालयामध्ये ठेवण्याची व्यवस्था करील. त्या व्यक्तीवर रुग्णालयामध्ये उपचार करण्यात येत असतील त्या कालावधीमध्ये ती व्यक्ती, कलम ३-क मध्ये निर्देशिलेल्या किमान वेतनाच्या निम्म्या दराने दैनिक मजुरी मिळण्यास हक्कदार असेल. अशी व्यक्ती मरण पावल्यास, तिच्या कायदेशीर वारसांना योजनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या रीतीने सानुग्रह प्रदान म्हणून, पन्नास हजार रुपये किंवा राज्य शासनाने याबाबतीत काढलेल्या सर्वसाधारण आदेशाद्वारे निश्चित करील अशी त्याहून अधिक, एवढी रक्कम देईल. अशी व्यक्ती अपंग झाली तर तिला योजनेनुसार ठरविण्यात येईल तितकी रक्कम सानुग्रह प्रदान करण्यात येईल. परंतु तिचा मृत्यु होईल त्याबाबतीत अशा प्रदानाची रक्कम पूर्वी म्हटल्याप्रमाणे राज्य शासनाकडून सानुग्रह प्रदान म्हणून निश्चित करण्यात आलेल्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही. सानुग्रह प्रदानाच्या रुपये ५०,००० या रकमेमध्ये केंद्र शासनाने अधिसूचीत केल्याप्रमाणे रुपये २५,००० इतक्या रकमेचा समावेश असेल.

(दोन) राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा शर्थींना अधीन राहून, जी स्त्री तिच्या अपेक्षित प्रसूतीच्या दिनांकाच्या निकटपूर्व बारा महिन्यांमध्ये, एकशे पन्नास दिवसांपेक्षा कमी नसणाऱ्या कालावधीसाठी किंवा विहित करण्यात येईल अशा त्याहून कमी कालावधीसाठी, या योजनेअन्वये रोजगारावर असेल अशा प्रत्येक स्त्रीला, तीस दिवसांच्या कालावधीकरिता कामावर अनुपस्थित राहण्याची परवानगी देण्यात येईल आणि या कालावधीमध्ये, तिला, ती अशा परवानगीने ज्या दिनांकापासून अनुपस्थित राहील त्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या महिन्यात तिला देय असणाऱ्या किंवा तिला देण्यात आलेल्या दैनिक वेतनाइतकी रक्कम सानुग्रह प्रदान म्हणून घेण्यास परवानगी असेल.

(तीन) राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा शर्तींना अधीन राहून, जी व्यक्ती, या योजनेअन्वये रोजगारावर असेल व जी संततीनियमन व कुटुंब नियोजन यासाठी म्हणून राज्य शासन याबाबतीत मान्य करील अशी निर्बीजीकरण शस्त्रक्रिया किंवा अन्य कोणतीही शस्त्रक्रिया किंवा उपचार करून घेईल अशा प्रत्येक व्यक्तीला, राज्य शासनाने याबाबत मान्यता दिलेला वैद्यकीय अधिकारी शिफारस करील अशा, चौदा दिवसांहून अधिक नसणाऱ्या अशा कालावधीसाठी विश्रांती व प्रकृती सुधारण्याकरिता कामावर अनुपस्थित राहण्याची व अशा कालावधीत तिच्या दैनिक सरासरी वेतनाइतकी रक्कम सानुग्रह प्रदान म्हणून घेण्याची परवानगी असेल.

**२८.** (एक) या योजनेअन्वये रोजगारावर असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या सोबत असणाऱ्या मुलास अपघाताने शारीरिक इजा झाली किंवा अशा इजेमुळे अशा मुलास तात्पुरती, अंशतः किंवा पूर्णतः विकलांगता आली किंवा त्याचा मृत्यु झाला तर ती व्यक्ती, त्या मुलाकरिता म्हणून राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे ठरवील अशा विनामूल्य वैद्यकीय उपचारास हक्कदार असेल आणि जिल्हाधिकारी किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेला अधिकारी ठरवील अशी रक्कम सानुग्रह प्रदान म्हणून मिळण्यास हक्कदार असेल ; ही रक्कम संबंधित व्यक्तीला होणाऱ्या शारीरिक इजा, इत्यादींसाठी परिच्छेद २७ मध्ये घालून दिलेल्या प्रमाणापेक्षा कोणत्याही बाबतीत अधिक असणार नाही.

(दोन) राज्य शासनास, प्रत्येक प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार, त्याला सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे लादणे योग्य वाटेल अशा शर्तीस अधीन राहून, या परिच्छेदात ज्यासाठी तरतूद नाही अशा रोजगार हमी योजनेखालील रोजगारावर असताना उद्‌भवणाऱ्या तशाच प्रकारच्या इतर कोणत्याही हालअपेष्टांतून किंवा आकस्मिक परिस्थितींतून मार्ग काढण्यासाठी परिच्छेद २७ अन्वये राज्य शासनाने काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निश्चित करण्यात आलेल्या सानुग्रह प्रदानाच्या रकमेहून अधिक नसेल इतकी रक्कम या योजनेअन्वये रोजगारावरील कोणत्याही व्यक्तीला सानुग्रह प्रदान म्हणून मंजूर करता येईल.

वेतन प्रदान :—

**२९.** (१) हजेरीपटाच्या समाप्तीच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत वेतनाचे प्रदान करण्यात आले नाही तर, काम मागणारी व्यक्ती, होणाऱ्या विलंबाकरिता, हजेरीपटाच्या समाप्तीनंतरच्या सोळाव्या दिवसानंतर वेतन न दिलेल्या प्रत्येक दिवसाकरिता ०.०५ टक्के या दराने नुकसान भरपाई मिळण्यास हक्कदार असेल.

(अ) भरपाई देय झाली असेल त्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या नंतरचा भरपाईच्या प्रदानातील कोणताही विलंब हा वेतन प्रदानातील विलंब म्हणून त्याच रीतीने विचारात घेण्यात येईल.

(ब) वेतन प्रदानातील जबाबदारी सुनिश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ आणि विविध कर्मचारी किंवा अभिकरणे यांची सदोषता परिगणित करण्यासाठी, राज्य, वेतन निश्चिती व त्याचे प्रदान यांची प्रक्रिया पुढीलप्रमाणे वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये विभागील :—

(एक) कामाचे मोजमाप ;

(दोन) हजेरीपटांचे संगणकीकरण ;

(तीन) मोजमापांचे संगणकीकरण ;

(चार) वेतनाच्या याद्या तयार करणे ; आणि

(पाच) निधी हस्तांतरण आदेश अपलोड करणे,

आणि विनिर्दिष्ट कार्ये पार पाडण्यासाठी जबाबदार असलेले कार्याधिकारी व अभिकरणे यांसह, टप्पानिहाय कमाल कालमर्यादाही विनिर्दिष्ट करील.

(क) संगणक प्रणालीमध्ये हजेरीपटाच्या समाप्तीच्या दिनांकावर व काम मागणाऱ्या मजुरांच्या खात्यांमध्ये वेतनाची रक्कम जमा केल्याच्या दिनांकावर आधारित देय असणारी नुकसान भरपाई स्वयंचलितरित्या परिगणन करण्याची तरतूद असेल.

(ड) राज्य शासन, वर विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे कालमर्यादेत यथोचित पडताळणी केल्यानंतर आगाऊ भरपाई अदा करील आणि रक्कम प्रदान करण्यात होणाऱ्या विलंबासाठी जबाबदार असणाऱ्या कार्याधिकाऱ्यांकडून किंवा अभिकरणांकडून नुकसान भरपाईची रक्कम वसूल करील.

(इ) प्रणाली कार्यन्वित झाली असल्याची सुनिश्चिती करणे हे जिल्हा कार्यक्रम समन्वयक अधिकारी किंवा कार्यक्रम अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

(फ) विलंब झाल्याच्या दिवसांची संख्या, देय व प्रत्यक्षात दिलेली नुकसानभरपाई हे, संनियंत्रण व माहिती प्रणालीत व कामगार अंदाजपत्रकामध्ये (लेबर बजेटमध्ये) दर्शविण्यात येतील.

(२) केंद्रीय अधिनियमाच्या कलम २७ च्या प्रयोजनांसाठी उप-परिच्छेद (१) ची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक समजण्यात येईल.

**३०.** वेतनांची प्रदाने, शासनाकडून सूट देण्यात येईपर्यंत, संबंधित बँकेत किंवा टपाल कार्यालयात मजुरांच्या वैयक्तिक बचत खात्याद्वारा अदा करण्यात येतील.

**३१.** योजनेअन्वये रोजगार पुरविण्याच्या बाबतीत, लिंगभेदावर आधारित कोणताही भेदभाव केला जाणार नाही आणि त्याबाबत समान पारिश्रमिक अधिनियम, १९७६ (१९७६ चा २५) याच्या तरतुदींचे अनुपालन करण्यात येईल.

अभिलेखांची देखभाल व गाऱ्हाणी निवारण यंत्रणा :—

**३२.** ग्रामपंचायत, देण्यात आलेले जॉब कार्ड व पासबुक, ग्रामपंचायतीसोबत नोंदणी केलेल्या कुटुंब प्रमुखाचे नाव, वय व पत्ता आणि कुटुंबाचे प्रौढ सदस्य याबाबतच्या तपशिलाचा

समावेश करून योजनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशारीतीने नोंदवह्या, पावत्या व इतर कागदपत्रे तयार करील व त्यांची देखभाल करील किंवा तयार करण्याची व देखभाल करण्याची व्यवस्था करील.

**३३.** ग्रामपंचायत, तिच्याकडे नोंदणी करण्यात आलेल्या अशा कुटुंबांच्या नावांची व पत्त्यांची सूची किंवा सूच्या आणि अशी इतर माहिती, योजनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशावेळी व अशा नमुन्यामध्ये संबंधित कार्यक्रम अधिकाऱ्याकडे पाठवील.

**३४.** (१) या अनुसूचीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, पूर, चक्रीवादळ, त्सुनामी व भूकंप यांसारख्या कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे ग्रामीण जनतेचे मोठ्या प्रमाणात विस्थापन झाल्यास, अशा प्रकारे बाधित झालेल्या क्षेत्रातील ग्रामीण कुटुंबांच्या प्रौढ सदस्यांना,—

(अ) नोंदणी करता येईल व तात्पुरत्या विस्थापित झालेल्या क्षेत्राच्या ग्रामपंचायतीकडून किंवा कार्यक्रम अधिकाऱ्याकडून जॉब कार्ड मिळवता येईल ;

(ब) तात्पुरत्या विस्थापित झालेल्या क्षेत्रातील कार्यक्रम अधिकाऱ्याकडे किंवा ग्रामपंचायतीकडे कामासाठी लेखी अर्ज किंवा मौखिक विनंती करता येईल ; आणि

(क) जॉब कार्ड हरविल्यास किंवा ते नष्ट झाल्यास, पुनर्नोंदणी करण्यासाठी आणि नवीन जॉब कार्ड मिळण्यासाठी अर्ज करता येईल.

(२) अशा जॉब कार्डांचे तपशील जिल्हा कार्यक्रम समन्वयकाला कळविण्यात येतील.

(३) परिस्थिती पूर्ववत सामान्य झाल्यास, अशा देण्यात आलेल्या जॉब कार्डाचे वास्तव्याच्या मूळ ठिकाणी पुनर्पृष्ठांकन करण्यात येईल आणि त्याचे मूळ नोकरीच्या कार्डासोबत एकत्रिकरण करण्यात येईल.

(४) प्रती कुटुंबाला हमी दिलेल्या रोजगाराच्या १०० दिवसांची संगणना करताना अशाप्रकारे देण्यात आलेल्या रोजगाराच्या एकूण दिवसांची गणना करण्यात येईल.

**३५.** या योजनेअन्वये गाऱ्हाणी निवारण यंत्रणेच्या तरतुदींप्रमाणे तक्रारी निकालात काढण्यासाठी अंमलबजावणी स्तरांवर प्रत्येक मजुरास आपले म्हणणे मांडण्याची व कोणतेही गाऱ्हाणे एकतर मौखिक किंवा लेखी स्वरूपात नोंदविण्याची संधी असेल.]

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई